रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १९२ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## पुस्तकांची बेकायदेशीर छपाई

**नागपूर :** बालभारतीकडे कॉपीराईट असलेली शैक्षणिक अभ्यासक्रमाची पुस्तकं नागपुरातील एका प्रिंटिंग प्रेसमध्ये बेकायदेशीररित्या छापण्यात येत होती. यासंदर्भात अत्यंत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर नागपूरच्या एमआयडीसी पोलिसांनी त्या प्रिंटिंग प्रेसवर धाड टाकून हजारो पाठ्यपुस्तक जप्त केली आहेत. दरम्यान, पोलिसांची कारवाई होण्यापूर्वीच प्रिंटिंग प्रेसमधील कर्मचारी पळून गेले, तर प्रिंटिंग प्रेसच्या मालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. नागपूरच्या हिंगणा एमआयडीसी परिसरातील प्रतिभा प्रिंटर्सच्या छापखाण्यात बालभारतीची शालेय पाठ्यपुस्तकं बेकायदेशीररित्या छापली जात होती.

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

विकणे आहे
पोयनाड (ता. अलिबाग)
एस.टी. बस थांब्यापासून
५ मिनीटाच्या अंतरावर
1 BHK Flat 635 Sqft.
Cont. 8425054720

# जिल्हाधिकाऱ्यांना समन्स

## || शपथपत्राबाबत टाळाटाळ महागात || राज्य माहिती आयोगाकडून २५ हजारांचा दंड

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून वारंवार करण्यात येणाऱ्या दिरंगाई आणि माहिती आयोगाच्या आदेशांकडे केलेल्या दुर्लक्षावर अखेर राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने कडक भूमिका घेतली आहे. माहिती आयुक्त शेखर चन्ने यांनी जिल्हाधिकाऱ्यांना २५ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचा ऐतिहासिक आदेश देत पुढील सुनावणीस प्रत्यक्ष हजर राहण्यासाठी अलिबाग पोलिसांमार्फत समन्स बजावण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. प्रशासनाच्या बेजबाबदारपणावर माहिती आयोगाने दिलेला हा दणका राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे.




नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासंदर्भातील माहिती अधिकारांतर्गत दाखल अपील प्रकरणात रायगड जिल्हाधिकाऱ्यांना आयोगाने प्रथम १० सप्टेंबर २०२५ रोजी शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्या दिवशी पंतप्रधानांचा दौरा असल्याचे कारण पुढे करत जिल्हाधिकाऱ्यांनी वेळ मागून घेतली. त्यानंतर आयोगाने दुसरी संधी देत २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सुनावणी ठेवली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी जेएनपीटीमध्ये नव्या अध्यक्षांची नियुक्ती झाल्यामुळे प्रकरणात उशीर झाल्याचे कारण देत पुन्हा मुदतवाढ मागितली.

इतक्या वेळा संधी देऊनही प्रशासनाने आदेशाचे पालन न केल्याने आयोगाने तिसरी आणि अंतिम संधी म्हणून ११ डिसेंबर २०२५ रोजी सुनावणी निश्चित केली होती. मात्र, या दिवशीही जिल्हाधिकारी स्वतः उपस्थित राहिले नाहीत, तसेच आवश्यक शपथपत्रही सादर करण्यात आले नाही. या सततच्या टाळाटाळीवर तीव्र नाराजी व्यक्त करत माहिती आयोगाने स्पष्ट शब्दांत प्रशासनाच्या भूमिकेवर ताशेरे ओढले.

अपिलार्थीला वेळेत माहिती न मिळाल्यामुळे झालेला आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास लक्षात घेऊन माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(ख) अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना २५ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही रक्कम थेट धनादेशाद्वारे अपिलार्थीस देण्याचे स्पष्ट निर्देश आयोगाने दिले आहेत. याचबरोबर आयोगाने असेही नमूद केले की, पान २ वर

### सुनावणी कधी?

या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे निश्चित करण्यात आली आहे. माहिती आयोगाच्या या निर्णयामुळे प्रशासनाकडून होणाऱ्या दिरंगाईला आळा बसणार असून, माहिती अधिकार कायद्यातील अपिलार्थ्यांचे हक्क अधिक भक्कम होणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. जिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्यांनाही आयोगासमोर जबाबदार राहावे लागते, हा स्पष्ट संदेश या आदेशातून देण्यात आला आहे.

> **शपथपत्र देण्याचे अधिकार नसल्याने ही कार्यवाही करण्यात आलेली नाही. केंद्र सरकारच्या आदेशानंतरच कार्यवाही केली जाणार आहे. राज्य आयोगाकडून पत्र प्राप्त झाले आहे.**
>
> **– भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन विभाग**

## माणिकरावांविरोधात अटक वॉरंट

- **प्रथम वर्ग न्यायालयाची दोन वर्षांची शिक्षा कायम**
- **सदनिका घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाचा निकाल**

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

शासकीय कोट्यातील सदनिका घोटाळ्याप्रकरणी नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवले असून, प्रथम वर्ग न्यायालयाने ठोठावलेली दोन वर्षे कारावासाची शिक्षा कायम ठेवली आहे. या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश न्या. पी.एम. बदर यांनी दिले असून कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. या निकालाने कोकाटे यांचे मंत्रीपद आणि आमदारकीही धोक्यात आली असून, फडणवीस सरकार आणि अजितदादा गटासाठी हा मोठा हादरा आहे.



नाशिक शहरातील पॅनडा कॉर्नर या उच्चभ्रू भागात १९९५ ते १९९७ दरम्यान माणिकराव कोकाटे, त्यांचे बंधू विजय यांनी शासनाच्या दहा टक्के कोट्यातील सदनिका अल्प उत्पन्न गटातून घेतल्या पान २ वर

### उच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणी

जिल्हा न्यायालयाची शिक्षा कायम ठेवावी, यासाठी ॲड. अंजली दिघोळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर शुक्रवारी, १९ डिसेंबर रोजी सुनावणी आहे, अशी माहिती ॲड. आशुतोष राठोड यांनी दिली.

## वेधक

### वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला

**बीड :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराड याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने हा जामीन अर्ज फेटाळला. गेल्या दोन दिवसांपासून यावर सुनावणी सुरू होती. बीड मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडप्रकरणी वाल्मीक कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, जामिनासाठी त्याने हायकोर्टात अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली.

### दहा शाळा बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली :** गुजरातच्या अहमदाबादमध्ये धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बुधवारी (दि.१७) अहमदाबाद शहरातील प्रमुख दहा शाळांना सकाळच्या सुमरास बॉम्बने उडवण्याच्या धमकीचा ई-मेल आल्याने खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने तात्काळ सूत्रं हालवत शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना सुखरुप बाहेर काढलं आणि तपासाला सुरुवात केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास धमकीचे ई-मेल प्राप्त झाले. दुपारी शाळांमध्ये बॉम्बस्फोट होईल, असं ई-मेलमध्ये लिहिले होते. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ हालचाल करत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सुखरूप बाहेर काढलं.

### मुंबई-गोवा मार्गावर अपघात



**रायगड :** मुंबई-गोवा महामार्गावर डंपर आणि ट्रॅव्हल्स बसचा मंगळवारी रात्री अपघात झाला. या अपघातामध्ये वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पेण लेनवरील शिरढोण पुलावर झालेल्या अपघातामुळे काहीवेळ वाहतूक कोंडी झाली होती. बस काढण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# नवी मुंबईत ४५ हजार दुबार मतदार

## महापालिका आयुक्तांची जाहीर कबुली

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महापालिकेच्या येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण नऊ लाख ४८ हजार ४६० मतदार मतदान करणारा असून, त्यामध्ये ४५ हजार ५८८ इतके दुबार मतदार आहेत, अशी जाहीर कबुली नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बुधवारी दिली. सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात यंदा १ हजार ४८ मतदान केंद्र तयार करण्यात येणार आहेत. मात्र, त्यापैकी एकही मतदान केंद्र हाऊसिंग सोसायटीमध्ये नसेल, असेही आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले.

नवी मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रशासनाने कशा पद्धतीने तयारी केली आहे याची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये महापालिका आयुक्त डॉ. शिंदे म्हणाले, नवी मुंबई शहरात प्रथमच चार सदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये निवडणूक होत आहे. त्यामुळे प्रशासनाने जनजागृतीवर विशेष भर दिला आहे. जास्तीत जास्त मतदारांनी घराबाहेर पडून मतदान करावे यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. उमेदवार जर मतदान केंद्र असलेल्या हाऊसिंग सोसायटीमध्ये राहात असेल तर त्या सोसायटीमधील मतदारांवर दबाव येण्याची शक्यता असते, त्यामुळे हाऊसिंग सोसायटीमधील मतदार केंद्र यंदा बंद करण्यात आले आहेत. प्रत्येक केंद्रावर मतदारांची संख्या ८०० ते ८५० इतकी ठेवण्यात आली आहे, अशी आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, लेखा अधिकारी सत्यवान उबाळे, उपायुक्त भागवत डोईफोडे आदी उपस्थित होते



मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासनाने सुमारे साडेसहा हजार कर्मचाऱ्यांची फौज तैनात ठेवली आहे. त्यापैकी ५ हजार ७०५ कर्मचारी प्रत्यक्ष पान २ वर

### आठ ठिकाणी स्वीकारणार अर्ज

नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी २८ प्रभाग तयार करण्यात आले आहेत. या प्रभागातील उमेदवारांचे उमेदवारी अर्ज हा आठ केंद्रांवर दाखल करता येणार आहेत. अर्ज दाखल करण्याची मुदत दि. २३ ते ३० डिसेंबरदरम्यान आहे. याच कालावधीमध्ये दि. २५ आणि २८ डिसेंबर हे दोन दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. या दोन्ही दिवशी अर्जाचे वितरण होणार आहे. मात्र, अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, अशीही आयुक्तांनी यावेळी सांगितले.

# ट्रकचालक जागीच ठार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघाताची मालिका थांबता थांबेना अशीच परिस्थिती झाली आहे. दिवसागणिक अपघाताची मालिका सुरू असल्याने या मार्गावरील प्रवास जिकिरीचा बनला आहे. याला वाहन चालकही काही प्रमाणात जबाबदार असल्याचे समोर येत आहे. बुधवारी (दि. १७) सायंकाळी सिमेंटचे ब्लॉक वाहतूक करणाऱ्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने ट्रकवरील चालकाचा ताबा सुटल्याने अपघात घडला. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, दुपारी ४ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास पुणे बाजूकडून मुंबईकडे सिमेंट ब्लॉक घेऊन



- **मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भीषण अपघात**

निघालेला एमएच.१२. एलटी ९७७७ (ट्रक) मुंबई दिशेने जात असताना अमृतांजन ब्रिजच्या जवळ आल्यावेळी ट्रकचे ब्रेक निकामे झाल्याने ट्रक चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला आणि या ठिकाणी असणाऱ्या कॉलमला जोरदार धडकल्याने अपघात घडला. या अपघातात ट्रक चालक हा जागीच मयत झाला आहे.

# अपघातात तरुणाचा मृत्यू



**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरातील समुद्रकिनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुणे येथून आलेल्या एका पर्यटकाच्या थार गाडीने दुचाकीस्वाराला जोरदार ठोकर दिली. हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. याबाबत सविस्तर वृत्त असे की, पुणे येथून आलेल्या काळ्या रंगाच्या एका थार गाडीने गाडी क्रमांक एम.एच.१२ व्ही. डब्ल्यू ८०५५ श्रीवर्धन येथील व्यावसायिक परवेज हमदुले हे आपल्या स्कुटीवरून पान २ वर

# तक्रारीवरून एकावर जीवघेणा हल्ला

## कुरकुंडी कोलटेंभी येथील घटना

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या माती उत्खननाविरोधात तक्रार केल्याप्रकरणी कुरकुंडी कोलटेंभी येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. तक्रारीवरून त्यांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला असून, ही घटना बुधवारी सकाळी घडली. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात उमेश पाटीलसह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन पाटील यांच्या तक्रारीवरून मिळालेल्या माहितीनुसार, रायदे-कुरकुंडी कोलटेंभी येथील सचिन जगन्नाथ पाटील हे बुधवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुचाकीवरून शेतावरील घरी निघाले होते. त्यावेळी गावातील उमेश पाटील यांच्यासह काही मंडळींनी धावत येऊन जिवघेणा हल्ला केला. यातील काही महिलांनी सचिन पाटील यांच्या अंगावर मसाला फेकला. त्यानंतर काठ्यांनी उपट घालून जखमी केले. सचिन पाटील यांच्या घराच्या संरक्षक भिंतीजवळ येऊन शिवीगाळी व ठार मारण्याची धमकी दिली.

गेल्या अनेक पान २ वर

# ई-शॉप वाहन खरेदीत घोटाळा?

## रायगड जिल्हा परिषदेमधील गैरप्रकाराची चर्चा जोरात

**। रायगड । प्रमोद जाधव ।**

रायगड जिल्हा परिषदेतील कर्मचारी वेतन फरकातील आर्थिक घोटाळ्यानंतर आता दिव्यांगासह मागासवर्गीय बचत गट व महिला बचतगटांच्या ई शॉप वाहन खरेदीतील घोटाळा समोर आला आहे. दीड लाख रुपयांत मिळणारी वस्तू साडेतीन लाख रुपयांत खरेदी केल्याने गैरप्रकाराची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही अधिकारी व कर्मचारी अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, त्यांच्यामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन



> आलेल्या तक्रारीनुसार ई शॉप वाहन खरेदीची पडताळणी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीद्वारे तपासणी करण्यात आली. परंतु, त्यात काही तथ्य नाही.
>
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

निर्माण व्हावा यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेत दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी १५६ ई-शॉप वाहन दिले होते. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. याचाच पान २ वर

# लाचखोर अधिकाऱ्यासह दोघे जाळ्यात

- **नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा दणका**
- **सहा लाख रुपयांची लाच घेताना पकडले रंगेहाथ**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मोजणीचे 'क' पत्र देण्यासाठी लाच घेतल्याप्रकरणी भूमीलेख विभागातील उपअधीक्षकासह निमतानदार यांच्याविरोधात सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा लाख रुपयांची लाच घेताना त्यांना पकडण्यात आहे. अंगझडतीत त्यांच्याकडे वीस हजारांहून अधिक रक्कम सापडली असून, त्यांची घरझडती सुरू केली आहे. नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा दणका भूमीअभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना मिळाला आहे.

तक्रारदार हे विकासक यांच्याकडे गेल्या तीन वर्षांपासून काम करीत आहेत. नवी मुंबई इंटरनॅशनल एअर पोर्ट इन्फुलन्स एरिया (नैना) येथे विकासक यांनी भूखंड क्रमांक २७ खरेदी केला. खरेदी केलेल्या भूखंडाच्या मोजणी व इतर प्रशासकीय कामाच्या निमित्ताने अर्ज व इतर आर्थिक व्यवहाराबाबत काम पहाण्याचे अधिकार तक्रारदार पान २ वर

# तिजोरीत खडखडाट, बायपास लटकणार

- **१२ कोटींचा निधी नसल्याने काम रखडणार**
- **वाहतूक कोंडीने नागरिक बेजार**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आठ वर्षांपूर्वी बायपासचे काम सुरू करण्यात आले. यातील सिडकोच्या अखत्यारीत असलेल्या साधारण ९४१ मीटर लांबीच्या रस्त्याचे काम सुरू असून, नवीन वर्षात ते तडीस लागणार आहे. मात्र, असे असले तरी पुढील जवळपास ४०० मीटर लांबीचा मार्ग नगरपरिषद करणार आहे. परंतु, यासाठी लागणारा बारा कोटींचा निधी खर्च करायला पालिकेकडे पैसेच नाहीत. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण होणार असले तरी पुढच्या मार्गाची रखडपट्टी कायम राहणार असल्याने, वाहतूक कोंडीचे शुक्लकाष्ट आणखी काही वर्ष राहणार आहे. केवळ बारा कोटींच्या निधीसाठी ६२ कोटींचा हा बायपास अजून किती वर्षे लटकणार? असा सवाल उरणकरांनी केला आहे.

उरण शहरातील वाहतूक कोंडीचा ताण हलका करण्यासाठी उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर उरण सिडकोने बायपास तयार करण्याची योजना आखली. सिडकोने द्रोणागिरी नोडमधील आनंदी हॉटेल ते उरण शहरातील कोर्टपर्यंतचा बायपास रस्ता तयार करण्याचे काम सुरू केले. या १ हजार ३४१ मीटर लांबीच्या रस्त्यापैकी ४०० मीटर लांबीचा रस्ता उरण नगर परिषदेच्या अखत्यारित येत आहे.; उर्वरित ९४१ मीटर लांबीचा बायपास रस्ता सिडकोमार्फत बांधण्यात येत आहे.

यामध्ये ६.४०.४२५ मीटर लांबीचा पूल व १५३.००४ लांबीच्या सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यासह १४८.०७१ लांबीच्या रिटेनिंग वॉलचा पान २ वर

### प्रशासनावर नाराजी

सिडकोच्या अखत्यारीतीतील ९४१ मीटर लांबीचा पूल व बायपास रस्ता पूर्ण झाला. तरी जोपर्यंत उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीत येणारा ४०० मीटर लांबीचा रस्ता तयार होणार नाही, तोपर्यंत बायपास रस्त्यावरून वाहतूक सुरु होणार नाही. उरण बायपास केवळ १२ कोटींच्या निधीअभावी रखडला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## अलिबाग न.प.चा प्लास्टिकमुक्तीसाठी उपक्रम | शहरात बसवणार पिशवी विक्रीच्या मशीन

# अवघ्या दहा रुपयांत मिळणार कापडी पिशवी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्लास्टीक बंदी बंधनकारक करण्यात आली आहे. अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने प्लास्टीक मुक्तीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. आता बाजारात खरेदीला जाताना दहा रुपयांत कापडी पिशवी एका बटणावर मिळणार आहे. नगरपरिषदेच्या वतीने कापडी पिशवी विक्री मशीन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पाच ठिकाणी या मशीन लावण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे.




अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर ओळखले जाते. प्लास्टीकच्या वापरामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असताना, पर्यावरणाचा समतोलही बिघडला जातो. पर्यावरणातील समतोल राखण्यासाठी अलिबाग नगरपरिषदेने प्लास्टीक बंदी विरोधी मोहीम राबविली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून शहरातील हॉटेल, दूध उत्पादक व्यावसायिक, भाजी विक्रेते, शू मार्ट आदी दुकानांमध्ये छापे टाकण्यात आले. मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग नगरपरिषदेच्या स्वच्छता निरीक्षक धनंजय आंब्रे, प्रकाश तांबे, सुमित गायकवाड, मुकादम, आरोग्य विभागाचे कर्मचारी आदी पथकाने कारवाई करीत ६९ किलो प्लास्टीक जप्त केले. त्यामध्ये प्लास्टीक पिशवीचे प्रमाण अधिक आहे. या कारवाईतून ७६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईने प्लास्टीकचा वापर करणाऱ्यांना दणका देण्यात आला.

शहरातील नागरिकांना कापडी पिशवीची सवय राहावी. अलिबाग शहरातील पर्यावरण समतोल राखण्यासाठी कापडी पिशवी विक्री मशीनची व्यवस्था पान २ वर

### प्लास्टीकमुक्त अलिबागसाठी जनजागृती

अलिबाग शहरातील नागरिकांना कापडी पिशवीची सवय लावण्यासाठी अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने वेग-वेगळे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. प्लास्टीकमुक्त अलिबागसाठी जनजागृती करण्यात आली आहे. ठिकठिकाणी फलक लावणे, पथनाट्याद्वारे जनजागृती करण्याचे काम नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

# दिव्यांगांसाठी ‘सेतू’ जमिनीवर

## जिना चढ-उताराचा त्रास वाचणार; तहसीलदार कपिल घोरपडेंचा स्तुत्य उपक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील दिव्यांग आणि वृध्दांसह महिलांनादेखील तहसिल कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या सेतू केंद्रात जाण्यासाठी धक्का नसलेल्या जिना चढून जा-ये करण्याचा त्रास कमी करण्यासाठी तहसिलदार कपिल घोरपडे यांनी सेतू केंद्र आता जमिनीवर आणले आहे. सोमवारपासून या सेतू केंद्रामध्ये कामकाजाला सुरूवात करण्यात आल्याची माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.


(छायाचित्र : शैलेश पालकर)

पोलादपूर तहसिल कार्यालयामधील सेतू केंद्रामध्ये जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अल्पभूधारक दाखला, नॉन-क्रिमिलेअर, शेतकरी प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना दाखला इत्यादींसाठी अर्ज करण्यासाठी तसेच विविध शासकीय परवाने मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरणे, टोकन सिस्टीम, रिअल-टाइम स्टेटस तपासणे आणि अर्जदाराचा वेळ वाचवण्यासह सरकारी कार्यालयांमध्ये होणारी गर्दी आणि गैरसोय टाळणे तसेच आवश्यक सेवा घराच्या जवळ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील आबालवृध्द महिला पुरूष ग्रामस्थ येत असतात.

मात्र, गेल्या चारपाच वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील सेतू सेवा केंद्र तहसिल कार्यालयाच्या वरील मजल्यावर असल्याने शारिरीक त्रास असलेल्या नागरिकांना अवघड तसेच सुलभ नसल्याने गैरसोय वाटत असल्याचे दिसून आले. यामुळे पोलादपूरचे तहसिलदार कपिल घोरपडे यांनी जुन्या ब्रिटीशकालीन तहसिल कार्यालयाच्या बेसमेंटवर पत्राशेडमध्ये सेतू केंद्र सुरू करण्यासाठी आकर्षक पत्राशेड उभारून सेतू सेवा केंद्राचे संचालक श्रीकांत मालुसरे यांना कामकाज जमिनीवर सुरू केल्यास नागरिकांची गैरसोय टाळणे शक्य होणार असल्याचे सुचविले. त्यानुसार सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ पासून महाराष्ट्र शासनाचे सेतू सेवा केंद्र नव्या पत्राशेडमध्ये सुरू करण्यात आले आहे. अशी माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.

# मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी सहकार्य करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वन्य प्राण्यांचा हल्ला होऊ नये, याकरिता नागरिकांना सतत जागरुक केले जात आहे. या सर्व उपाययोजना जिल्ह्यातील वन विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन, संयुक्त वनव्यवस्थापन समित्या, महसूल, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक नागरिक यांच्याशी समन्वय ठेवून, सहकार्याने प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. तरी या सर्व प्रक्रियेत मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित रायगड जिल्ह्यातील बिबट्याचा वाढता उपद्रव व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल (दूरदृश्यप्रणालीद्वारे), उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, उप वनसंरक्षक रोहा डॉ. शैलेंद्रकुमार जाधव हे उपस्थित होते. तर, कांदळवन विभागाच्या विभागीय वनअधिकारी कांचन पवार या दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होत्या. मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी जिल्ह्यातील वन विभागांकडून विविध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देत जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, बिबट्याच्या उपस्थितीबाबत माहिती प्राप्त होताच विशेष बचाव पथकांची नियुक्ती करणे, पिंजरे उभारणे, संवेदनशील भागांत गस्त घालणे, जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे, शाळा व ग्रामस्तरावर मार्गदर्शन करणे, निरीक्षणासाठी ट्रॅप कॅमेराचा वापर करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी विशेष बचाव पथक कार्यरत ठेवणे आदी सूचनाही संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना श्री.जावळे यांनी दिल्या.

सन-२००७ मधील महत्वाच्या तरतुदीनुसार मानव वन्यजीव संघर्षामुळे उद्‌भवणाऱ्या मानवी मृत्यू, गंभीर दुखापत, घरांचे नुकसान तसेच पिकांचे नुकसान या बाबींसाठी तात्काळ पंचनामा करुन नुकसानभरपाई देण्याबाबत निर्देश देण्यात आले. या बैठकीला विविध तालुक्यांतील वनक्षेत्रपाल तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# नॅशनल हेराल्डप्रकरणी काँग्रेस आक्रमक

- **ईडी कार्यालयावर धडक मोर्चा,**
- **भाजपाच्या हुकूमशाहीविरोधात घोषणाबाजी**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नॅशनल हेराल्डप्रकरणी न्यायालयाने निकाल दिल्यानंतर काँग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेत ईडी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. ईडी हे नरेंद्र मोदी सरकारच्या इशाऱ्यावर काम करत असून, सोनियाजी व राहुलजी गांधी यांना चौकशीच्या नावाखाली त्रास देण्यात आला. भ्रष्टाचाराचे आरोप करून काँग्रेस पक्ष, सोनियाजी व राहुलजी गांधी यांना बदनाम करण्यात आले. भाजपा सरकारने काँग्रेस नेतृत्वाला जाणीवपूर्वक व राजकीय सुडबुद्धीने गोवण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाने निकाल दिला आहे, आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोनियाजी व राहुलजी गांधी यांची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी करण्यात आली.

मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा एकनाथ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात आमदार अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत, प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, जिल्हाध्यक्ष रविकांत बावकर, कचरू यादव, केतन शाह, भावना जैन, अर्शद आझमी, राजपती यादव, अखिलेश यादव, राजेश शर्मा यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपा सरकारने मोर्चाला अडवण्यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवला होता, पण काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कशाचीही तमा न बाळगता सरकारविरोधात घोषणाबाजी केली. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेतले व नंतर सोडून देण्यात आले.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत व स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी बलिदान दिले आहे, त्याग केला आहे, त्यांच्यावर खोटे आरोप लावून बदनाम करण्याचे पाप करु नका हे पंतप्रधान नरेंद्र मोदी व ईडी नेही लक्षात ठेवावे. अशा प्रकारे काँग्रेस नेतृत्वाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला तर काँग्रेसचा कार्यकर्ता रस्त्यावर उतरून चोख उत्तर देईल’, असा इशारा यावेळी खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला.

# तळामध्ये सामूहिक शेतीला प्राधान्य

**। तळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील शेतकरीवर्गाचा सामूहिक शेतीकडे कल वाढत असून, या सामूहिक शेतीतून चांगले उत्पादन मिळत आहे. तळा तालुक्याला निसर्गाने भरभरून दिले आहे. डोंगर, दऱ्या, हिरवीगार शेतं आणि समुद्र किनारा. हे सारं वैभव असूनही स्थलांतराचा मोठा प्रश्न आहे. पोटापाण्यासाठी आपलं घर सोडून मुंबई, नालासोपारा आदी ठिकाणी नोकरी-व्यवसायानिमित्ताने तरुणांना जावे लागत आहे.

कधी काळी समृद्ध असलेली गावं आज ओस पडू लागली आहेत. ज्या शेतात पिकणारं सोनं पाहून शेतकरी आनंदी असायचा, त्याच मातीला सोडून, लोक शहरात नोकरी करू लागले. जर शेतकरी एकजूट झाला तर याला नक्कीच एक वेगळं वळण मिळू शकतं हे लक्षात आल्याने गावागावात एकत्र समूह शेतीला प्राधान्य दिले जात आहे. जेव्हा शेतातून भरभरून उत्पादन येऊ लागेल, तेव्हा त्याला काढायला, निवडायला, पॅक करायला गावातील हातांना काम मिळेल. मग गावातीलच महिलांना, पुरुषांना गावातच संधी मिळेल.



भातापासून पोहे, मुरमुरे बनवण्याचे छोटे कारखाने गावाजवळच उभे राहू शकतील. आंब्याचा गर काढण्याची युनिट्स सुरू झाली तर तरुणांना रोजगार मिळू शकतो. गावातच कृषी तज्ज्ञांचं मार्गदर्शन मिळू शकते. रोवळा येथील बचत गट सामूहिक शेती करून कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले उत्पन्न मिळवत आहेत. तसेच तालुक्यातील वानस्ते, पिटसई भागात सामूहिक शेतीकडे तरूण वळत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

# खोपोली नगरपरिषदेला आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन

## ● मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या पुढाकारात मोठी कामगिरी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेला आंतरराष्ट्रीय दर्जा व्यवस्थापन आयएसओ मानांकन ९००१:२०१५ प्राप्त झाले असून, नगरपरिषदेच्या सेवांच्या गुणवत्तावृद्धीकडे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ROHS Certification Pvt. Ltd. यांच्या वतीने हे प्रमाणपत्र ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदान करण्यात आले आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज पाटील यांच्या नियोजनबद्ध कामगिरीमुळे मानांकन प्राप्त झाले आहे.

उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यामागे मुख्याधिकारी खोपोली नगरपरिषद पंकज पाटील यांचा पुढाकार, प्रभावी नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठपुरावा यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेतील कार्यपद्धतीत सुधारणा, आधुनिक तंत्रांचा वापर, पारदर्शकता आणि नागरिक-केंद्रित सेवा यावर विशेष भर देण्यात आला.

आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणपत्राचे क्षेत्र नागरी मूलभूत सेवा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व वितरण, रस्ते देखभाल, सार्वजनिक प्रशासन तसेच परवाने व प्रमाणपत्रे जारी करणे या सेवांपर्यंत मर्यादित आहे.

या प्रमाणपत्राची वैधता ४ डिसेंबर २०२८ पर्यंत राहणार असून पहिली सर्व्हिलन्स तपासणी ५ नोव्हेंबर २०२६ रोजी आणि दुसरी तपासणी ५ नोव्हेंबर २०२७ रोजी होणार आहे. नागरिकांना अधिक गुणवत्तापूर्ण, जलद व कार्यक्षम सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या मानांकनामुळे खोपोली नगरपरिषद सक्षम होत असल्याचे मत प्रशासकीय व नागरिक स्तरावरून व्यक्त करण्यात येत आहे. या यशाबद्दल नगरपरिषद प्रशासन, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# श्रमसंस्कार शिबिराचे आज उद्घाटन

- **दिवील येथे मोरे महाविद्यालय रासेयो विभागाचे शिबीर**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन तालुक्यातील दिवील या गावी उद्या गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ. महेश वल्ले यांनी दिली आहे.

दि. १८ ते २४ डिसेंबर या कालावधीदरम्यान संपन्न होणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन प्रिव्ही स्पेशालिटी केमिकल्स लिमिटेड, महाड या सुप्रसिध्द कंपनीचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट (एच.आर.आय. आर. अँड ॲडमिनिस्ट्रेशन) राम सुर्वे यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी शिवाई शिक्षण संस्थेचे खजिनदार किशोर मोरे, तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य चंद्रकांत कळंबे, एकनाथ गायकवाड, दिलीप भागवत, अश्विनी गांधी तसेच दिवील गावचे सरपंच सागर देवे, उपसरपंच प्रमोद मोरे, सामाजिक कार्यकर्ते विक्रम भिलारे यांच्यासह ग्रामस्थ व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या शिबिराचा समारोप बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी दिवील येथे सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे.

प्रोसेस जमा	अर्जदारातर्फे वकिल
दि.	ॲड. अनिकेत गुरव

**अलिबाग येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश क-स्तर सो. श्रीमती एस.ए. पर्वतकर सो यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज नं.१०२/२०२५

**जाहीर नोटीस** **नि.६/ड**

१) श्रीमती सुशिला अभिमन्यु पाटील
२) श्री. सुभाष अभिमन्यु पाटील
३) श्री. प्रविण अभिमन्यु पाटील
४) प्रतिभा कृष्णा थळे
(पुर्वाश्रमीची प्रतिभा अभिमन्यु पाटील)
५) सुलभा दिलीप पाटील अर्जदार
(पुर्वाश्रमीची सुलभा अभिमन्यु पाटील)
६) शैलजा विकास पाटील
(पुर्वाश्रमीची शैलजा अभिमन्यु पाटील)
७) शुभांगी हेमंत म्हात्रे
(पुर्वाश्रमीची शुभांगी अभिमन्यु पाटील)

विरूद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ७ यांचे वडील कै. अभिमन्यु अर्जुन पाटील यांचे दिनांक २३/०१/२०११ रोजी हरकिसनदास हॉस्पिटल, मुंबई निधन झालेले असून त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं. १ ते ७ यांनी वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि.२/२/२०२६ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेचा हुकूम अर्जदार नं. १ ते ७ यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. १७/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश**
**व. स्तर अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

सही/-
**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर अलिबाग**

दिनांक : १८ डिसेंबर २०२५

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| चंद्रहास निलकंठ म्हात्रे | ३६ | ४ | ०-१२-०० | ०-१० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १८/१२/२०२५

## पान १ वरून

# जिल्हाधिकाऱ्यांना समन्स

या प्रकरणात रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची साक्ष अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे पुढील सुनावणीस ते अनुपस्थित राहू नयेत यासाठी माहिती अधिकार अधिनियम कलम १८(३)(क) तसेच दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतुदीनुसार समन्स जारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे समन्स अलिबाग पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व रायगडचे पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत बजावले जाणार आहेत.

# नवी मुंबईत ४५ हजार दुबार मतदार

मतदान केंद्रावर काम करणारा असून, उर्वरित कर्मचारी हे राखीव असणार आहेत, असे आयुक्तांनी यावेळी सांगितले.

**निकाल अवघ्या दोन दिवसांत**

नवी मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर १६ जानेवारी रोजी मतमोजणी पार पडणार आहे. त्यासाठी आठ मतमोजणी केंद्र तयार करण्यात येणार आहेत. २०१५ च्या निवडणुकीची मतमोजणी फक्त तीन मतमोजणी केंद्रावर झाली होती. मात्र, यंदा मतमोजणी केंद्राची संख्या पाचने वाढवली जाणार असल्याने निकाल अवघ्या दोनच तासांत लागणार आहे.

**दुबार मतदारांवर नजर**

नवी मुंबई शहरात एकूण मतदारांची संख्या नऊ लाख ४८ हजार ४०० साठी इतकी आहे. त्यामध्ये पाच लाख १६ हजार २६७ पुरुष मतदार, तर चार लाख ३२ हजार ४० महिला मतदार आहेत. दुबार मतदारांची संख्या ४५ हजार ५८८ इतकी आहे. या मतदारांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. दुबार मतदारांना एकच ठिकाणी मतदान करता येणार आहे.

# तक्रारीवरून एकावर जीवघेणा हल्ला

महिन्यांपासून कुरकोंडी कोलटेंभी परिसरातील सचिन पाटील यांच्या मालकीच्या जागेतून बेकायदेशीररित्या माती उत्खनन केले जात आहे. याबाबत अनेक वेळा मंडळ अधिकारी, तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र, त्यांच्याकडून योग्य कारवाई करण्यात आली नाही. शासनाचे नियम धाब्यावर बसवून हा माती उत्खननाचा प्रकार होत आहे. महसूल प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने पोलीस, जिल्हा, कोकणस्तरावर तक्रारी करण्यात आल्या आहेत. बेकायदेशीररित्या माती उत्खननाबाबत करण्यात आलेल्या तक्रारी अर्जाचा राग धरून जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप सचिन पाटील यांनी केला आहे. त्यामुळे पोयनाड पोलीस काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

# माणिकरावांविरोधात अटक वॉरंट

होत्या. यावर आक्षेप घेत माजी मंत्री स्वर्गीय तुकाराम दिघोळे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कन्या ॲड. अंजली दिघोळे राठोड या प्रकरणात तक्रारदार आहेत. अल्प उत्पन्न असल्याचे आणि दुसरे घर नसल्याच्या खोट्या माहितीची कागदपत्रे दिल्याचे समोर आले. २० फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिकच्या प्रथम वर्ग न्यायालयाने या घोटाळ्याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय यांना प्रत्येकी दोन वर्षांची शिक्षा व पन्नास हजारांचा दंड ठोठावला होता. जिल्हा सत्र न्यायालयाने मंगळवारी दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आणि दंडाची रक्कम दहा हजार रुपये केली. यामुळे कोकाटे यांचे मंत्रीपद व आमदारकी धोक्यात आली आहे.

**राजीनाम्यासाठी राज्यपालांना पत्र देणार**

‘‘कोकाटे हे गुन्हेगार असून, त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी करणारे पत्र उद्या राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना देणार आहे, असे ॲड. आशुतोष राठोड यांनी सांगितले.

**प्रकरण काय?**

मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या दोन सदनिका हडपल्याचा कोकाटे बंधूंवर आरोप आहे. नाशिक शहरातील पॅनडा कॉर्नरसारख्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या अपार्टमेंटमध्ये या सदनिका आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करून या सदनिका हडपल्याची माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांची मूळ तक्रार होती. त्यांच्या निधनानंतर त्यांची मुलगी ॲड. अंजली दिघोळे राठोड यांनी हे प्रकरण लावून धरले.

# ई-शॉप वाहन खरेदीत घोटाळा?

एक भाग म्हणून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांना रोजगार करता यावा यासाठी ई-शॉप वाहन ही योजना मागील वर्षी हाती घेण्यात आली होती.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात आली होती. योजनेंतर्गत दिव्यांग व्यक्ती ७१, मागासवर्गीय बचतगट २८, महिला बचतगट ५७ लाभार्थ्यांना ई-शॉप वाहने देण्यात आली. पर्यावरणस्नेही ई-शॉप वाहन प्रत्येकी सुमारे ३ लाख ५० हजार रुपयांनी खरेदी करण्यात आले होते. यासाठी सुमारे साडेपाच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. वाहनातील अंतर्गत भागात व्यवसायाच्या दृष्टीने डिझाइन करण्यात आले होते. सर्व विभागांचा ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या निधीतून दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना व्यवसाय करता यावा यासाठी ई-शॉप वाहन देण्याचे निश्चित केले होते. तसेच महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी ई-शॉप वाहन देण्यात आले होते. मात्र, ई-शॉप वाहन खरेदीत घोटाळा झाला असून योग्य लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे काही संघटनांनी आरोप केला आहे. त्यामुळे काही अधिकारी व कर्मचारी मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# लाचखोर अधिकाऱ्यासह दोघे जाळ्यात

यांना विकासकाने दिले होते. त्यानुसार तक्रारदार यांनी भूखंड मोजणीसाठी विकासक यांच्या नावे असलेला अर्ज भूमीलेख विभागातील जिल्हा अधीक्षक यांच्या कार्यालयात जमा केला. विकासक यांच्या नावे नोटीस देऊन तो भूखंड ३ डिसेंबरला मोजणीसाठी ठेवला असल्याचे भूमीअभिलेख विभागाककडून कळविण्यात आले.

पाच डिसेंबरला त्या भूखंडाची मोजणी झाली. त्यानंतर मोजणीचे रिपोर्ट घेण्यासाठी तक्रारदार गेले. त्यावेळी उपअधीक्षक दिलीप बागुले यांनी मोजणीचे क पत्र देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे सहा लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्याकडे १५ डिसेंबरला तक्रार केली. घटनेचे गांभीर्य ओळख धर्मराज सोनके यांनी कारवाई सुरु केली. पडताळणी करून सापळा रचला. मंगळवारी (दि. १६) सहा लाख रुपयांची लाच घेताना दिलीप बागूले यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तसेच लाच देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिल्याने निमतानदार कलिमोद्दीन रियाजोद्दीन शेख तसेच उपअधीक्षक दिलीप बागुले यांच्याविरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दोघांच्या घराची झडती या विभागाने सुरू केली आहे.

# तिजोरीत खडखडाट, बायपास लटकणार

सिडकोच्या अखत्यारीतीतील ९४१ मीटर लांबीचा पूल व बायपास रस्ता पूर्ण झाला. तरी जोपर्यंत उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीत येणारा ४०० मीटर लांबीचा रस्ता तयार होणार नाही, तोपर्यंत बायपास रस्त्यावरून वाहतूक सुरु होणार नाही. उरण बायपास केवळ १२ कोटींच्या निधीअभावी रखडला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

समावेश आहे. मागील सात-आठ वर्षांपासून सुरू असलेल्या पुलाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे. सिडकोच्या अखत्यारित असलेले उरण बायपास रस्त्याचे काम ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. हा बायपास रस्ता पूल कार्यान्वित झाल्यानंतर उरण शहरातील जनतेचा वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघेल, असा विश्वास सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रियांका रातांबे यांनी व्यक्त केला.

# अपघातात तरुण ठार

घरी जात असताना मद्यधुंद अवस्थेत असलेल्या पर्यटकांनी चुकीच्या बाजूनी गाडी चालवून त्यांना जोरदार ठोकर दिली व गाडी जवळजवळ ४० फूट फरफटत पुढे नेली.

अपघात एवढा भयानक होता की, परवेज हमदुले यांचा डोक्याला जबर मार लागल्याने जागीच मृत्यू झाला. श्रीवर्धन पोलिसांनी तातडीने या घटनेची दखल घेत गाडीमधील सर्व युवकांना श्रीवर्धन पोलीस ठाण्यात नेले व सदर अपघाताच्या जागी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तदेखील लावण्यात आला. त्यानंतर परवेज हमदुले यांना शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. त्या ठिकाणीदेखील जमावाने खूप मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. जमलेल्या गर्दी कडून श्रीवर्धन शहरातील वाणी परिसरातील मार्ग रोखून धरण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु, पोलीस प्रशासनाने योग्य भूमिका घेत जमावाचा हा प्रयत्न हाणून पाडला. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन शहरामध्ये अतिरिक्त पोलीस फाटा तैनात करण्यात आला आहे.

# अवघ्या दहा रुपयांत मिळणार कापडी पिशवी


नगरपरिषदेच्या मार्फत करण्यात आली आहे. पाच मशीन असून, या मशीनच्या एका बटणावर दहा रुपयांत एक पिशवी विकत मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. या मशीन लवकरच शहरातील बाजारपेठांसह वर्दळीच्या ठिकाणी लावण्यात येणार आहेत. त्यामुळे आता मांसाहार पदार्थांसह भाजी व इतर पदार्थ खरेदी करण्यासाठी प्लास्टिक पिशवीच्या ऐवजी कापडी पिशवी शहरामध्ये उपलब्ध होणार आहे.

## निवडक



## लोकअदालतीत हजारो प्रकरणे निकाली

**पनवेल :** दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने शनिवारी (दि.१३) लोक आदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पनवेल येथील न्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व आणि दाखल अशी एकूण ९ हजार ५८८ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे. अशी माहिती जिल्हा न्यायाधीश १ तथा पनवेल तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष शैलेश उगले यांनी दिली. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच महावितरण, बँक, फायनान्स, पतपेढी संस्था अशा विविध विभागांकडून आलेली वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. पनवेल येथील जिल्हा न्यायालयातील लोक अदालतीमध्ये वादपुर्व व प्रलंबित अशी एकूण ४७ हजार ३३६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. ३८ हजार ८३१ वादपूर्व प्रकरणांपैकी ५ हजार २२९ आणि ८ हजार ५२३ प्रलंबित खटल्यांपैकी ४ हजार ३५९ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. त्याद्वारे एकूण ४५ कोटी ७८ लाख ८८ हजार ५३५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.



## सुरेश खैरेंच्या प्रयत्नातून डागडुजी

**पाली-गोमाशी :** मुख्यमंत्री सडक योजने अंतर्गत गोमाशी फणसवाडी रस्ता करण्यात आला होता. मात्र, गोमाशी ते फणसवाडी हा रस्ता काही ठिकाणी उखडून गेला होता. यामार्गावरून पाली-फणसवाडी ही बससेवा सुरू असून या बसने विद्यार्थी व ग्रामस्थ प्रवास करीत असतात. परंतु, या रस्त्यावरील खडी निघाल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे नागरिकांच्या जीवाशी बेतत होते. या रस्ताची झालेली दुरवस्था ग्रामस्थांनी शेकाप नेते सुरेश खैरे यांना सांगितली असता त्यांनी ग्रामस्थांसमोर ठेकेदाराला संपर्क साधून ताबडतोब रस्त्याची डागडुजी करण्याचे सांगितले. ठेकेदाराने मंगळवारी (दि.१६)ताबडतोब या रस्त्याची डागडुजी करून दिली. या रस्त्याची डागडुजी सुरेश खैरे यांच्या प्रयत्नातून करण्यात आल्याबद्दल ग्रामस्थ आणि तरुण मंडळ फणसवाडी यांनी सुरेश खैरे यांचे विशेष आभार व्यक्त केले.


## कर्मचाऱ्यांकडून वृद्धेला मारहाण

**पनवेल :** येथील एका नामांकित वृद्धाश्रमातील कर्मचाऱ्यांनी ९० वर्षांच्या वृद्धेला क्षुल्लक कारणावरून मारहाण केल्याची घटना घडली. पीडित महिलेच्या भाचीने यासंदर्भात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी घटनेची शहानिशा करून दोन्ही कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. पनवेलमधील एका नामांकित वृद्धाश्रमात राजू व अनिल हे दोन कर्मचारी काम करतात. या दोन कर्मचाऱ्यांनी या वृद्धेला मारहाण केली. या महिलेने तिच्या भाचीकडे आश्रमातील वागणुकीची तक्रार केली होती. याची माहिती त्या कर्मचाऱ्यांना मिळाली. त्या रागातून त्यांनी पुन्हा काठीने आणि बुक्क्याने वृद्धेला मारहाण केली. तसेच, तिला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याचे पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या जखमी वृद्धेला कांदिवली येथील रूगणालयात औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश सहाय्यक पोलीस निरिक्षक गौरव इंगोले यांना दिले.



## शेवटच्या गुरुवारसाठी महिलांची लगबग

**उरण :** मार्गशीर्ष महिन्यामध्ये प्रत्येक गुरुवारी महालक्ष्मीचे व्रत केले जाते. त्यासाठी लागणारे पूजेचे साहित्य, देवीचे मुखवटे, चुनरी, केळी, हार, फुले या वस्तू खरेदी करण्यासाठी महिलांची दुकानांत विशेष गर्दी असते. आता शेवटचा गुरुवार असल्याने बुधवारी (दि.१७) उरणच्या बाजारात नेहमीपेक्षा अधिक गर्दी दिसून आली. यावेळी केळी ५० ते ८० रुपये डझन विकली गेली असून वेणी ३० रुपये, पाच झाडांच्या पानांची जुडी२० रुपये, तर पाच फळे ८० ते १०० रुपये अश्या भावाने विकले जात असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. त्याचबरोबर अस्टर फुले (नग) १५ रुपये, वेणी ५० रुपये, हार १० रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत अश्या भावाने विकले जात होते.



## पन्नासव्या दिवशीही भूमीपुत्रांचा ठिय्या

**पाली :** नागोठण्यातील भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्थानिक भूमिपुत्रांना येथील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीमध्ये कायमस्वरूपी नोकरी मिळावी, या मागणीसाठी आझाद मैदानावर सर्व प्रकल्पग्रस्त उपोषणाला बसले आहेत. ५० व्या दिवशीही आझाद मैदानावर ठिय्या सुरूच आहे. जोपर्यंत कायमस्वरूपी नोकरीचे कॉल लेटर रिलायन्स कंपनी देत नाही, तोपर्यंत आम्ही आझाद मैदानावर आमरण उपोषणालाला बसून राहू, अशी आक्रमक भूमिका प्रकल्पग्रस्तांनी घेतलेली आहे. आम्हाला कायमस्वरूपी नोकरी द्या, अन्यथा आमच्या जमिनी परत करा, अशी जोरदार मागणी देखील केली आहे.



मुरूड पर्यटन महोत्सव व नाताळच्या सुट्टीत सुक्या मासळीची मोठ्या प्रमाणात विक्री होते. त्यामुळे पुढे येणाऱ्या पर्यटकांसाठी मासळी सुकवण्याचे काम सुरू आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# रेवदंडा बाजारपेठेला वाहतूक कोंडीचे ग्रहण

### ॥ पार्किंगच्या असुविधेमुळे समस्या वाढली ॥ वाहनांच्या सुमारे दोन किमीपर्यंत रांगा

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता खुपच अरूंद रस्ता आहे. याच मार्गावरून अलिबाग-मुरूडकडे ये-जा करणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. या रस्त्यावर दोन अवजड वाहने समोरासमोर आली की मोठी वाहतूक कोंडी होते. त्यातच रेवदंडा बाजारपेठेतील घरे व दुकाने हि रस्त्यालगत असल्यामुळे खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना आपले वाहन उभे करण्यासाठी जागा नसते. त्यामुळे ते रस्त्यावरच आपले वाहन उभे करून खरेदीसाठी जातात. परिणाम वाहतुक कोंडीमध्ये त्याची आणखी भर पडते. ही समस्या वर्षानुवर्षे सुरू असून रेवदंड्यातील वाहतुक कोंडीचा आणि वाहनतळाच्या असुविधेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे येथून मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा असते. विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिद्धीस असल्याने येथून पर्यटक देखील मोठ्या प्रमाणात ये-जा करीत असतात. मुंबईकडून येणाऱ्या पर्यटकांना मुरूडला पर्यायी मार्ग नसल्याने त्यांना रेवदंडा बाजारपेठ मार्गेच मुरूडकडे जावे लागते. ही बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये बसलेली असून या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे. दोन मोठी वाहने समोरासमोर आली की ती पास होईपर्यंत खुप वेळ जातो. त्यातच रेवदंडा बाजारपेठेत आजुबाजुच्या परिसरातील नागरिक खरेदीसाठी आपली वाहने सोबत घेऊन येत असतात. परंतु, बाजारपेठेतील बहुतांश दुकाने ही रस्त्याला चिकटून असल्यामुळे आणि वाहनतळाची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने आपले वाहन कुठे उभे करावे, असा प्रश्न वाहनचालकांना पडतो. त्यामुळे मिळेल त्या जागी किंवा दुकानासमोर रस्त्यावरच वाहन उभे करून खरेदीसाठी जातात. यावेळी मोठे वाहन आले की त्याला या रस्त्यावरून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. तसेच, येथील घरे देखील रस्त्याला खेटून आहेत. त्यामुळे घरातुन बाहेर पडताना त्यांना जिव मुठीत घेऊन बाहेर पडावे लागते.



### वाहनांची बेशिस्त पार्किंग

रेवदंडा बाजारपेठेवर रेवदंडा पंचक्रोशीतील गावांसह अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील गावे अवंलबून आहेत. त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्य गर्दीचे ठिकाण आहे. मात्र, बाजारपेठेतील अरूंद रस्ता आणि वाहनतळाची असुविधा यामुळे ग्राहकांना आपली दुचाकी, चारचाकी, रिक्षा, मालवाहतूक टेम्पो तसेच लहान मोठी वाहने मिळेल त्या जागी बेशिस्तीने उभी केली जातात. त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या मोठ्या बसेस व मालवाहतूक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे याठिकाणी नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

### वाहनतळाची सुविधा अत्यंत गरजेची

बाजारपेठेतील अरुंद रस्ताने दोन मोठी वाहने पास होताना फारच जिकीरीचे असते. शिवाय बाजारेपेठेत कुठेही वाहनतळाची सुविधा उपलब्ध नसल्याने चालकांनी रस्त्यात बेशिस्तपणे उभी केलेली लहान मोठी वाहने ये-जा करणाऱ्या मोठ्या वाहनांना अडथळा निर्माण करतात. त्यामुळे रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुलदरम्यान नित्याने वाहतूक कोंडीची समस्या उद्‌भवत असते. अरूंद रस्ता आणि वाहनतळाची सुविधा नसल्यानेच वाहतूक कोंडी होत असल्यामुळे याठिकाणी वाहनतळावची सुविधा अत्यंत गरजेची असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

> **रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग शहरापासून ते अगदीच मुरूड, रोहापर्यंतचे ग्राहक खरेदीसाठी या बाजारपेठेत येत असतात. मात्र, येथील रस्ता अत्यंत अरूंद असल्यामुळे याठिकाणाहुन दोन मोठी वाहने पास होतोना त्यांना मोठी कसरत करावी लागते. तसेच, वाहनतळाची सुविधा नसल्याने ग्राहकांना जागा भेटेल तिथे किंवा रस्त्यावरच वाहन उभे करावे लागते. त्यामुळे वाहतुक कोंडीला तोंड फुटते. हि समस्या वर्षानुवर्षे सुरू असून यावर ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे.**
>
> **- निलेश खोत, स्थानिक**

> **आम्हाला रेवदंडा बाजारपेठ जवळ असल्याने आम्ही खरेदीसाठी नेहमीच या ठिकाणी येत असतो. मात्र, येथील रस्ता अत्यंत अरूंद असल्यामुळे आणि वाहन उभे करण्यासाठी जागा नसल्याने मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे मिळेल त्या जागी किंवा रस्त्यावरच आपले वाहन उभे करून ग्राहक खरेदीसाठी जातात. त्यामुळे एखादे मोठे वाहन आले की ते संपूर्ण रस्ता व्यापून टाकते. त्यामुळे आमच्या सारख्या खरेदीदारांना रस्त्यावरून चालताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते.**
>
> **- सदाशिव आंग्रे, ग्राहक**

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ता आणि वाहनतळ उपलब्ध नसल्यामुळे रस्त्यावरच बेशिस्त पणे उभी केलेली वाहने यामुळे स्थानिकांच्या सुरक्षेसह वाहतुक कोंडी आणि वाहनतळाच्या असुविधेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



## ‘माझा कोपरा, माझी कला’

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव शाळेत विद्यार्थ्यांना ‘माझा कोपरा, माझी कला’ हा उपक्रम देण्यात आला होता. यावेळी इयत्ता सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थीनी कस्तुरी जाधव व आकांक्षा वाघे यांनी वारली चित्र शाळेच्या कार्यालयासमोर असलेली भिंत साफ करून त्यावर मातीने सारवून वारली चित्रकला रेखाटली. वारली चित्रकला खूप प्राचीन चित्रकला मानली जाते.

या शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ती आत्मसात केल्यामुळे त्यांचे कौतुक होत आहे. या वारली चित्रातून जल, जंगल, जमीन, घर, पाळीव प्राणी, पक्षी, झाडे असे विविध आशय रेखाटण्यात आले.

त्याचबरोबर हर्ष गडगे याने भाषा फलक लेखन करून सजावटीत उत्कृष्ट योगदान दिले. यावेळी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगीतले की, २०२० नुसार पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे फार गरजेचे आहे. त्यातून कला व कार्य या विषयांसाठी ‘माझा कोपरा, माझी कला’ हा उपक्रम संजीवनी ठरत आहे.

## म्हसळ्यातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

मुरुड येथील आरोपीने म्हसळा तालुक्यातील देवघर येथील एका सोळा वर्षीय मुलीला इंस्टाग्रामवर संपर्क साधून तो तिच्या घरापर्यंत पोचला. त्याने त्या मुलीला फिरायला जाण्यासाठी जबरदस्ती केली. ती त्याच्यासोबत जाण्यास तय्यार झाली नाही. त्यामुळे आरोपीने तिला दम दिला की, मी तुझ्या आईसह तुला देखील मारून टाकेन. त्यामुळे या भीती पोटी ती आरोपीसोबत फिरायला गेली. त्यानंतर दुपारी ४ वाजताच्या दरम्यान जंगलात जाऊन तिच्यावरती आरोपीन अत्याचार केला. ही गोष्ट सायंकाळी तिच्या आईला समजतात आईने विचारणा केली असता तीने ही सगळी हकीगत सांगितली. त्यानंतर पीडितेच्या आई-वडीलांनी त्वरित पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन तासांच्या आत आरोपीला ताब्यात घेऊन त्याला बेड्या ठोकल्या. या प्रकरणी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, म्हसळा पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या सह त्यांच्या टीमने उत्कृष्ट कामगिरी करून पीडित कटुंबाला त्वरीत न्याय मिळवून दिल्याने पोलिसांचे कौतुक केले जात आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे हे करीत आहेत.

**■ पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या**

## तरुणीचे अपहरण

**पनवेल :** पारगाव येथील १६ वर्षीय तरुणीला कोणीतरी पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणीचे नाव प्रज्ञा सतिश शिंदे असे असून रंग निमगोरा, अंगाने-मध्यम, उंची ५ फुट २ इंच, डोक्याचे केस काळे व लांब, नाक सरळ, डोळे काळे, अंगामध्ये नेसुन पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातलेला आहे.

## आठ लाखांच्या दागिन्यांची चोरी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल एसटी स्टँड परिसरात चारचाकी कार मध्ये बसले असताना एका व्यक्तीने ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विचुंबे येथील कृष्णा रामा ठाकूर १३ डिसेंबर रोजी पत्नीसह अलिबाग येथे नातेवाईकांचे लग्न असल्याने जाताना पत्नीचे दागिने सोबत घेऊन त्यांनी ते कपड्याच्या बॅगमध्ये ठेवले होते. ते पनवेल बस स्टॅन्ड येथे आले. यावेळी ते स्टॅन्डसमोर अलिबाग येथे जाणाऱ्या खासगी गाडीकडे आले. यावेळी पांढऱ्या रंगाच्या एर्टिगा कार चालकाने अलिबाग येथे जाणार असल्याचे सांगितले. आणि ते त्या गाडीत बसले. मात्र, प्रवासी नसल्याने उशीर होईल, त्यामुळे बॅग डिकीत ठेवा, असे चालकाने सांगितले. त्यांनी बॅगा डिकीत ठेवल्या आणि कारच्या सीटवर बसले. यावेळी मागच्या सीटवर एक जोडपे बसले होते. ते देखील अलिबागच्या दिशेने निघाले होते. त्यांच्यासोबतची महिला कार्ले खिंड येथे उतरली. त्यानंतर ठाकूर आणि त्यांची पत्नी अलिबाग येथे उतरून रिक्षा पकडून राहत्या घरी चिंचोटी येथे पोहोचले. घरी पोहोचल्यावर बॅगेमध्ये ठेवलेले दागिने पाहिले असता दागिने सापडून आले नाहीत.

### नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचा उपक्रम | महिन्याभरात पूर्ण ताकदीने राबवला जाणार

# कर्मचाऱ्यांवर राहणार ‘जीपीएस’द्वारे नजर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पोलीस कर्मचारी दिलेला बंदोबस्त किंवा सोपवलेली जबाबदारी चोख निभावतात की नाही, हे यापुढे जीपीएस ट्रॅकद्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित कळणार आहे. बंदोबस्ताचे ठिकाण सोडून इतरत्र थांबण्याचे प्रकार टाळण्यासह बंदोबस्तामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येते का? हेही या माध्यमातून पडताळले जाणार आहे. यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम हाती घेतला असून, महिन्याभरात तो पूर्ण ताकदीने राबवला जाणार आहे.




नवी मुंबईसह पनवेल परिसराचा होणाऱ्या विकासाच्या तुलनेत पोलिसांकडे अपुरे मनुष्यबळ आहे. परिणामी गुन्हेगारांचा शोध घेणे, रोजचे बंदोबस्त यांचे नियोजन करताना अधिकाऱ्यांना झळ बसते. त्यातच काही कर्मचारी दिलेला बंदोबस्त चोखरित्या न बजावता भलत्याच ठिकाणी बसलेले असतात. याचा परिणाम गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याच्या कामावरही होतो. रस्त्यावर पोलीस दिसले तरीही अनेकदा गुन्हेगारी कृत्याला आळा बसतो. हीच परिस्थिती वाहतूक पोलिसांच्या बाबतीतदेखील आहे. अनेकदा गुन्हेगारांच्या मागावर राज्यभरात किंवा राज्याबाहेर असलेल्या पोलिसांच्या सुरक्षेचाही प्रश्न गंभीर असतो. ते नेमके कोणत्या ठिकाणी व कोणत्या अवस्थेत आहेत याचीही क्षणाक्षणाची माहिती थेट पोलीस आयुक्तालयात नोंद होणार आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबवला जात असून, त्यात समोर येणाऱ्या बाबी पडताळल्या जात आहेत. याशिवाय महिन्याभरात पूर्ण ताकदीने हा उपक्रम राबवला जाणार आहे.

अनेकदा बंदोबस्तावर नेमलेले पोलीस परस्पर गैरहजर राहण्याचे प्रकार घडत असतात. त्यामुळे कागदोपत्री नेमलेल्या बंदोबस्ताच्या ठिकाणी प्रत्यक्षात कोणीच हजर नसते किंवा निश्चित केलेल्या जागेऐवजी वेगळ्याच ठिकाणी कर्मचारी भलतेच कर्तव्य बजावत असतात. ट्रॅकमुळे वरिष्ठांना अपडेट समजणार असल्याने कामचुकारांना आळा बसणार आहे. गुन्हेगारी नियंत्रणासाठी नाकाबंदीचा केली जाते. मात्र, एक मार्ग बंद झाला तरीही इतर मार्गांनी गुन्हेगार निसटू शकतात. अशा वेळी नाकाबंदीच्या नियोजनाचीही जुळवाजुळव जीपीएस ट्रॅकिंगच्या माध्यमातून होऊ शकते. त्यात कोणत्या ठिकाणी किती कर्मचारी हजर आहेत, हे तपासले जाणार आहे. तसेच यामुळे वाहतूक कोंडी प्रश्न सुद्धा निकाली निघणार आहेत.

## शिक्षिकेच्या खात्यातून लाखोंची रक्कम लंपास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे प्रभाग ३४ येथील ४५ वर्षीय महिला शिक्षिकेने घराच्या नूतनीकरणासाठी बँकेतून २४ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ही संपूर्ण रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झाली होती; मात्र, दुसऱ्याच दिवशी त्यांच्या मोबाईलचे नेटवर्क अचानक बंद पडले. घरी आल्यानंतर वायफायच्या माध्यमातून इंटरनेट सुरू झाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सिम कार्ड बदलून घेतले. मात्र, आईला पैसे पाठवण्यासाठी खात्यातील शिल्लक तपासली असता केवळ ७०५ रुपये उरल्याचे दिसून आले. यावेळी त्यांच्या खात्यातून २३ लाख ८८ हजार रुपये परस्पर लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# रामाचे नाव, रावणाचे काम

मोदी सरकारने मनरेगा अर्थात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेचे नाव बदलून जी रामजी की असे करण्याचे ठरवले आहे. रामदास आठवले जशा ट ला ट जुळवून वाटेल तशा कविता करतात तेच नरेंद्र मोदी करत असतात. जी रामजी की अशी आद्याक्षरे तयार करण्यासाठी गॅरंटी फॉर रोजगार अँड आजिविका मिशन ग्रामीण असे ना धड इंग्रजी, ना धड हिंदी नामकरण करण्यात आले आहे. हे सगळे करण्यातच मोदी सरकारातील मंत्री व आयएएस अधिकाऱ्यांची बुध्दी खर्ची पडत असावी. कारण, भारताचा रुपया डॉलरच्या तुलनेत ९१वर पोचला, देशातील उद्योगपती आपला पैसा इथे गुंतवायला तयार नाहीत त्याबाबत काही करावे त्याकामी यांची बुध्दी उपयोगी पडत नाही. २०१४ मध्ये मोदी पहिल्यांदा सत्तेत आले तेव्हा त्यांनी मनरेगावर टीका केली होती. काँग्रेसला इतकी वर्षे गरिबी दूर करता आली नाही त्या पापाचे स्मारक म्हणजे ही योजना असून आपण ती मुद्दाम तशीच चालू ठेवणार आहोत असे ते म्हणाले होते. वास्तविक जगातील सर्वात श्रीमंत अशा अमेरिकेतही गरीब लोकांसाठी अन्नवाटपाच्या किंवा मदतीच्या योजना सरकार चालवत असते. जर्मनी व युरोपीय देशांमध्ये बेकारांना भत्ता दिला जातो. गरिबांना अशी मदत करणे ही सरकारांची जबाबदारी मानली जाते, त्यांच्या पापांचे स्मारक मानले जात नाही. पण काँग्रेसवर टीका करण्यासाठी मोदी कोणत्याही पातळीवर जाऊ शकतात हे वारंवार दिसले आहे. गंमत म्हणजे याच मोदींनी गेली पाच वर्षे ८० कोटी लोकांना रेशनवर फुकट अन्नधान्य वाटण्याची योजना चालवली आहे. याच मोदींचा भाजप लाडली बहनासारख्या पैसे-वाटपाच्या योजना राबवून निवडणुका जिंकत असतो. त्या दृष्टीने महाराष्ट्र किंवा बिहारची सरकारे म्हणजे भाजपच्या पापांची जितीजागती स्मारकेच म्हणायला हवीत. बिहारमध्ये महिलांना एकरकमी दहा हजार रुपये वाटण्यात आले आणि महाराष्ट्रात लाखो अपात्र महिलांना लाडक्या बहिणी ठरवल्याने सरकारचे दिवाळे वाजून विद्यार्थी, शेतकरी, कंत्राटदार इत्यादींवर आत्महत्येची वेळ आली आहे. या पापांची जबाबदारी कोणाची हेही सवड मिळेल तेव्हा मोदींनी सांगायला हवे.

### फसवी तरतूद

देशभरातील बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती गेल्या काही वर्षात अधिकाधिक तोट्यात चालली आहे. त्यामुळे शेतीतील रोजगार दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. ज्यांच्याकडे बरीच जमीन आहे, बाहेरून टाकायला पैसे आहेत व पाण्याची सोय आहे अशा काही मोजक्या शेतकऱ्यांना कदाचित यात थोडाफार फायदा होत असेल. पण त्यांचाही भर यांत्रिक शेतीवर असल्याने रोजगार कमीच निर्माण होतात. त्यातच सततचे दुष्काळ, अतिवृष्टी इत्यादींमुळे पिके बुडण्याचे प्रमाण वाढते. परिणामी ग्रामीण भागातील मजुरांनाच नव्हे तर शेतकऱ्यांनाही काम देणे आवश्यक बनते. महाराष्ट्राने १९७२ च्या दुष्काळानंतर रोजगार हमी योजना लागू केली. तिच्याच धर्तीवर २००५ मध्ये केंद्राने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना आणली. मनमोहनसिंग सरकार आल्यावर त्यांनी घेतलेला हा पहिला मोठा निर्णय होता व त्याला भाजपसह सर्व पक्षांनी पाठिंबा दिला होता. सोनिया गांधी यांच्या दबावामुळे हा निर्णय झाला असे भाजपवाले कुत्सितपणे म्हणत असले तरी त्यात सोनियांचा वैयक्तिक फायदा काही नव्हता, ती जनतेच्या भल्याचीच होती हे लक्षात ठेवायला हवे. एरवी मोदी सरकार परदेशात पळून जाणाऱ्या गुजराती धंदेवाल्यांच्या डोंबलावर लाखो कोटी रुपये उधळत असेल. पण ग्रामीण जनतेला रोजगार देणाऱ्या या योजनेबाबत मात्र मोदींना पहिल्यापासून राग होता. हरेक गोष्टीत रामाचे नाव घेत असले तरी त्यांचे काम पहिल्यापासून रावणाचे राहिले आहे. रामाची सत्यनिष्ठा, तत्वनिष्ठा यांच्यात एका अंशानेही नाही. आता तर रावणाप्रमाणेच त्यांनी ही योजना पळवून तिचे नामांतर केले आहे. या योजनेमध्ये पूर्वी दरवर्षी एका कुटुंबाला शंभर दिवस काम देण्याची हमी होती. ती नव्या योजनेत १२५ दिवस करण्यात आली आहे. त्यामुळे आपण योजनेचा विस्तार केल्याचा सरकारचा दावा आहे. पण तो फसवा आहे. योजनेची अंमलबजावणी राज्य सरकारची यंत्रणा करते. स्थानिक पातळीवर मनरेगा कामांची मागणी झाली की निकष पूर्ण करून जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर ती मंजूर होतात. पण म्हणून मागेल त्याला वाटेल तितके काम असे होत नाही. भारतभरची सरासरी पाहिली तर वर्षाला जेमतेम ५५ दिवस किंवा सुमारे दोन महिने इतकेच काम या योजनेखाली उपलब्ध केले जाते असे आकडे सांगतात. १०० दिवस काम देण्याची हमी असूनही ही स्थिती आहे. आता कामाची हमी १२५ दिवसांवर नेल्याने खालच्या वस्तुस्थितीत काही फरक पडणार नाही.

### केंद्राच्या दयेवर

आजवर या योजनेच्या खर्चापैकी ९० टक्के रक्कम केंद्राकडून येत असे. दहा टक्के वाटा राज्याचा होता. आता राज्यांना तब्बल ४० टक्के वाटा उचलावा लागणार आहे. जीएसटी लागू झाल्यापासून राज्य सरकारांचे उत्पन्नाचे स्त्रोत आधीच बंद झाले आहेत. त्यांना केंद्राकडून येणाऱ्या निधीची वाट पाहत राहावे लागते. त्यातच पश्चिम बंगाल किंवा तमिळनाडू अशा राज्यांमध्ये विरोधकांची सरकारे असल्याने त्यांना त्रास देण्यासाठी मोदी सरकारने मनरेगाचा त्यांचा निधी बंद करून ठेवला होता. ममता बॅनर्जी यांना सर्वोच्च न्यायालयात जाऊन हा निधी मिळवावा लागला. प्रत्येक टप्प्यावर विरोधकांची अडवणूक व छळवणूक करणे हाच मुळी मोदी सरकारचा व्यवहार राहिला आहे. आता रामाच्या नावाने येणाऱ्या नवीन योजनेमध्ये तर तो आणखीनच दुष्ट होणार आहे. पूर्वी किती व कोणती काम करायची याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जात असे. स्थानिक गरजेनुरुप वेगाने निर्णय होण्यासाठी हे आवश्यक होते. आता मात्र किती व कोणती कामे करायची हे केंद्र सरकार ठरवून देणार आहे. भाजपच्या विरोधात मतदान करणाऱ्या भागांना निधी मिळू नये याची व्यवस्था करण्यासाठीच जणू ही तरतूद करण्यात आली असावी. थोडक्यात, मोदी सरकारला या योजनेचेही राजकारण करायचे असून अंतिमतः ती बंद पाडायची आहे. प्रत्यक्षात मात्र आम्ही अधिक काळ काम उपलब्ध करून देणार असल्याचे ते मानभावीपणे सांगत आहे. मनरेगामुळे शेतीच्या कामांसाठी मजूर मिळत नसल्याची एक सार्वत्रिक ओरड आहे. त्यासाठी राज्य सरकारांनी वर्षातले पेरणी व काढणीचे ठराविक साठ दिवस निश्चित करून ते कळवावेत. त्या काळात मनरेगाची कामे घेतली जाणार नाहीत असाही एक प्रस्ताव यात आहे. पण याचा उलटा परिणाम होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात समजा १० जून ते ३० जून असा काळ पेरण्यांसाठीचा म्हणून निश्चित झाला की तो मनरेगासाठी बाद होईल. पण या काळात समजा पाऊस आला नाही तर मनरेगा चालू करण्यासाठी राज्याला केंद्राच्या नाकदुऱ्या काढाव्या लागतील. थोडक्यात, सर्व अधिकार केंद्राकडे देणारी आणि राज्यांना भिकाऱ्यासारखी मागतकरी करणारी अशी ही राक्षसी योजना आहे. आणि, हे सर्व रामाच्या नावाने होणार आहे.

विचार

# कामगार कल्याण की भांडवलशाहीचे उदात्तीकरण

*केंद्र सरकारने नवे कामगार कायदे लागू केले असले तरी त्यातील अनेक बाबींमुळे भांडवलशाहीला झुकते माप दिले जात आहे. कामगारांना मिळणारे अल्प वेतन, नोकरीची अनिश्चितता, न्याय्य हक्कांच्या मागण्यांसाठी करावी लागणारी आंदोलने या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने लागू केलेली नवी संहिता कामगारांच्या हितावर गदा आणणार आहे. कामगार संघटनांचीही अशीच भावना आहे. त्याचाच हा ऊहापोह.*



डॉ. भालचंद्र कानगो

केंद्राने कामगार कायद्यांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यासाठी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० आणि वेतन संहिता, २०१९ या कंपन्यांनी कामगारांना वेतन आणि लाभ देण्यासाठी बनवलेल्या कायद्यांमध्ये काही अंतर्गत महत्त्वाचे बदल आणि तरतुदी केल्या आहेत. २९ केंद्रीय कामगार कायद्यांचे चार व्यापक कामगार संहितांमध्ये एकत्रीकरण करणे हे केंद्रापुढील एक आव्हान होते. कारण कामगार संघटना आणि आस्थापना या दोन्ही बाजुंचा या संहितेमध्ये विचार करावा लागणार होता. अपेक्षेप्रमाणे या आचारसंहितेबद्दल विभाजित प्रतिसाद निर्माण होणे अपेक्षित होते, पण या कायद्यांद्वारे कामगार असंतोषात वाढच होणार आहे. या संहितांचे उद्दिष्ट प्रस्थापित चौकटीचे आधुनिकीकरण करणे आहे, परंतु सुधारित संहितेमुळे कामगारांच्या संरक्षणावर गदा येऊ शकते. वेतन संहिता, २०१९ नुसार संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांमधील सर्व कामगारांसाठी एक वैधानिक किमान वेतन हमी दिली जाते. कोणतेही राज्य केंद्रीय बेंचमार्कपेक्षा कमी वेतन देऊ शकत नाही. पूर्वी एखाद्या आस्थापनेने कामगारांना किमान वेतन न दिल्यास गुन्हेगारी अपराध मानला जाऊन आस्थापनेच्या मालकाला कायदेशीर अटक आणि आर्थिक दंड अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षेची तरतूद होती. नवीन संहितेद्वारे त्यात बदल झाला आहे. यामुळे आता केवळ दंडात्मक कारवाई होऊ शकेल.

समान कामासाठी पुरुष आणि महिला या दोहोंची कार्यक्षमता वेगवेगळी असू शकते, तरी सुधारित संहिता दोन्ही वर्गांना समान वेतन अनिवार्य करते. महिलांना त्यांच्या संमतीने धोकादायक उद्योगांसह सर्व क्षेत्रांमध्ये रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी देणे, हे महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. पूर्वी महिलांनी रात्री दहानंतर काम करू नये, असा नियम होता. औद्योगिक प्रतिष्ठानात कामगार कपात करण्यासाठी किंवा आस्थापना बंद करण्यासाठी आता सरकारी मंजुरीच्या मर्यादेची आवश्यकता वाढवण्यात आली आहे. नवीन मर्यादा ३०० किंवा त्याहून अधिक कामगार असलेल्या आस्थापनांसाठी करण्यात आली आहे (पूर्वी ती १०० कामगार होती). याचा परिणाम म्हणजे २९९ कामगारांपर्यंत कामगार असलेल्या नियोक्त्यांना त्यांच्या कामगारांच्या व्यवस्थापनात मनमानी करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. काही कामगार संघटनांच्या मते हा वादाचा मुद्दा आहे. यामुळे कामगारांना असलेली नोकरी सुरक्षा कमकुवत होईल. टीकाकारांचा युक्तिवाद आहे की यामुळे मोठ्या कंपन्यांना कामगारांना देखरेखीशिवाय मोठ्या संख्येने काढून टाकणे सोपे होईल, ज्यामुळे नोकरी सुरक्षा आणि सामूहिक सौदेबाजीची शक्ती कमकुवत होईल. नवीन अटी आणि वेळापत्रकांमुळे कामगारांना कायदेशीर संप करणे लक्षणीयरीत्या कठीण जाईल, त्याद्वारे कामगारांचा संप करण्याचा अधिकार प्रभावीपणे हिरावून घेतला जाईल. परिणामी, कामगार वर्गाच्या फायद्यावर गदा येईल.

नवीन संहितेमुळे कामगारांना आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संप पुकारणे मुश्किलीचे होणार आहे. एकदा संपाची सूचना मिळाली आणि समेटाची कार्यवाही सुरू झाली की, कायद्याद्वारे एक निर्बंधित कालावधी लादला जाईल. त्या दरम्यान कामगार संपावर जाऊ शकणार नाहीत. कामगार आणि कामगार संघटनांचा या सुधारित निर्णयाला जोरदार आक्षेप असणार आहे. कारण आस्थापनांना जादा कामाचा दबाव कामगारांवर टाकायला पूर्ण मोकळीक मिळणार आहे. कारण अशा वेळी कामगारांनी काम सुरू ठेवण्यास नकार दिला तर तो संप अनधिकृत मानला जाणार आहे. अशा परिस्थितीत आस्थापना कामगार संघटनांवर दंडात्मक कारवाईदेखील करू शकेल अशी तरतूद सुधारित संहितेमध्ये करण्यात आली आहे. कामगार संघटना आणि काही कामगार समर्थकांच्या दृष्टिकोनातून काही बदल कामगारविरोधी किंवा विद्यमान संरक्षणांना कमकुवत करणारे म्हणून टीका करण्यात आली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारे कामगारांसाठी सार्वत्रिक लाभ संरचना (जसे की ईपीएफ किंवा ईआयएससी) अंमलात आणू शकतील, पण कामगारांना होणाऱ्या प्रत्यक्ष लाभांबाबत त्यात स्पष्टता नाही. कर्मचाऱ्यांची सामाजिक सुरक्षा एका निधीवर अवलंबून असते, ज्याचा अंशतः वित्तपुरवठा एकत्रित योगदानाने केला जातो. टीकाकारांचा असा युक्तिवाद आहे की हा निधी संभाव्यतः अपुरा, हमी नसलेला आहे. त्यामुळे कामगारांचे कल्याण होणे अनिश्चित असेल. जे भारतीय कामगारांच्या मोठ्या भागापर्यंत मूलभूत सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी संरक्षण पोहोचवणे या संहितेच्या मूळ उद्देशांशी संलग्न नसेल. कामगारांचे अधिकार या सुधारित संहितेने मर्यादित केल्याची टीका कामगार आणि त्यांच्या संघटना जोरदार करत आहेत, कारण आचारसंहितेत अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी असलेल्या तरतुदी 'कामगारविरोधी' आणि 'भांडवलशाही समर्थक' असल्याचा त्यांचा आरोप आहे. कामगार आणि आस्थापना यांच्यात होणाऱ्या संघर्षाचे मूळ कारण म्हणजे वेतनवाढ आणि केली जाणारी कपात असते. वेतन संहितेनुसार 'मूलभूत वेतन' एकूण मोबदल्याच्या किमान पन्नास टक्के असावे. यामुळे निवृत्ती भत्ते (जसे की पीएफ आणि ग्रॅच्युइटी) मोजण्यासाठी आधार वाढतो, जो दीर्घकाळात फायदेशीर असतो, परंतु त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचा हातात मिळणारा मासिक पगार कमी होऊ शकतो, कारण मूलभूत भत्ते कमी होतात. टीकाकारांचा युक्तिवाद आहे की, केंद्रीय कामगार संघटना आणि प्रमुख भागधारकांशी पुरेशी सल्लामसलत न करता केंद्र सरकारकडून संहिता पुढे आणण्यात आली आहे. याच सल्लामसलतीच्या अभावामुळे संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन कामगार संहितेचा उद्देश भारताच्या कामगार बाजाराची मूलभूत पुनर्रचना करणे, व्यवसायांसाठी नियम सोपे करणे (व्यवसाय करणे सोपे करणे) वाटत असला तरी किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षेसारखे महत्त्वाचे फायदे कामगारांच्या विस्तृत गटाला उपलब्ध करून देण्यात ही संहिता फोल ठरणार आहे. काही जाणकारांच्या मते औद्योगिक कामगारांवरील अन्यायाचा प्रश्न विशेषतः संहितेतील तरतुदींमधून उद्भवतो. नव्या कामगार संहितेद्वारे कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि सार्वत्रिक वेतन संरक्षण मिळत नाही.

जाणकारांच्या मते, सामाजिक सुरक्षेवरील संहिता व्यापक असंघटित क्षेत्राचा समावेश करण्यासाठी प्रथमच सुरक्षा जाळ्याचा लक्षणीय विस्तार करते. या कामगारांसाठी उभारल्या जाणाऱ्या कल्याण निधीमध्ये आपल्या उलाढालीचे काही टक्के योगदान देणे मालकांसाठी बंधनकारक राहते. प्रत्येक कामगाराला औपचारिक नियुक्तीपत्रे देणे अनिवार्य केल्याने नोकरीची सुरक्षा आणि कागदपत्रे हक्काने मिळतील, अशी अपेक्षा आहे, परंतु याची अंमलबजावणी कशी होईल याबाबत स्पष्टता नाही. कर्मचाऱ्यांना कपात आणि टाळेबंदीसाठी पूर्व सरकारी मंजुरी आवश्यक असलेल्या आस्थापनांसाठी मर्यादा १०० वरून ३०० पर्यंत वाढवण्यात आली आहे (औद्योगिक संबंध संहितेअंतर्गत), जी कामगारांच्या फायद्याच्या तत्वांना धरून नाही. याखेरीज संहितेची अंमलबजावणी करताना काही समस्या येणार आहेत. वेतनाच्या सुधारित व्याख्येनंतर पीएफ आणि ग्रॅच्युइटीसारखे वैधानिक फायदे कर्मचाऱ्याच्या एकूण मोबदल्याच्या किमान ५० टक्के असले पाहिजेत. सध्या यापेक्षा जास्त भत्ते असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कंपन्यांना पगाराची पुनर्रचना करावी लागू शकते. त्यामुळे दीर्घकालीन बचत (पीएफ/ग्रॅच्युइटी) वाढवून हातात येणाऱ्या निव्वळ पगारात घट होण्याची शक्यता आहे. केंद्रीय संहिता लागू होत असताना नोंदणी आणि तपासणीच्या प्रक्रियांसह अंतिम ऑपरेशनल तपशील, नियम आणि योजना, वैयक्तिक राज्य सरकारांनी अद्याप सूचित केल्या पाहिजेत.

एकसमान राज्य नियमांचा अभाव 'एक भारत, एक कायदा'चे ध्येय पूर्ण करण्यास विलंब करू शकतो. विशाल, अनौपचारिक कार्यबलापर्यंत प्रभावीपणे पोहोचणे, कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे आणि नियोक्त्यांकडून, विशेषतः लघु आणि मध्यम उद्योगांकडून (एमएसएमई) अनुपालन सुनिश्चित करणे, कामगार कल्याणाचा विचार करता हे संहितेच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वपूर्ण आव्हान आहे.

# जिल्ह्यावर 'वणवा' नावाचे संकट



संतोष राऊळ

सध्या जिल्ह्याला 'वणवा' नावाच्या संकटाने ग्रासले आहे. यंदाचा पावसाळा लांबणीवर गेल्यामुळे अगदीच नोव्हेंबर महिन्याच्या शेवटापर्यंत हिरवीगार दिसणारे डोंगर आता काळोभोर दिसू लागले आहेत. याला मुख्य कारण म्हणजे मानवनिर्मित 'वणवा'. या वाढत्या वणव्यांमुळे निसर्गप्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. वन विभागाला देखील वणवा भडकल्यावर जाग येत असून त्यांचे आग विझविण्याचे प्रयत्न देखील फोल ठरत असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे.

रायगड जिल्हा हा कोकण किनारपट्टीवरील निसर्गरम्य असा जिल्हा आहे. येथे समुद्रकिनाऱ्यासह मोठ्या प्रमाणात डोंगर रांगा आहेत. त्यामुळे याठिकाणी पर्यटकांचा देखील ओघ वाढत आहे. तसेच, यंदाचा पाऊस लांबल्यामुळे जिल्ह्यातील डोंगर हिरवेगार झाले होते. आता हिवाळा सुरू झाला असून दुपारच्या वेळेला उन्हाची तिव्रता देखील प्रचंड प्रमाणात वाढली आहे. परिणामी डोंगरावरील हिरवेगार गवत सुकू लागले असून डोंगराने जणू सोनेरी झालर परिधान केल्याचा भास होत आहे. परंतु, याच डोंगराला 'वणवा' नावाच्या संकटाने ग्रासले आहे. जिल्ह्यात दरवर्षी रस्ते, वाढते शहरीकरण, औद्योगिक विकास आणि खाणींच्या नावाखाली डोंगर फोडले जात आहेत. तसेच, हजारो वृक्षांची तोड केली जाते. त्यातच वणव्यांचे प्रमाण वाढल्याने उरली सुरलेली वनसंपदा देखील धोक्यात येत आहे. यावर निसर्गप्रेमींची प्रचंड नाराजी आहे. त्यांच्या मते, ज्या भुमातेच्या पोटी आपण जन्म घेतला, तिच्याच पोटी वृक्ष, पशु-पक्षी व प्राण्यांनी जन्म घेतला आहे. त्यामुळे ते देखील आपल्या भावंडांप्रमाणेच आहेत. त्यामुळे त्यांना वाचविणे हे आपल्या रक्तातच आहे. परंतु, आपण असे करतच नाहीत. उलट आपल्या फायद्यासाठी सर्रासपणे वणवा लावून देतो. त्यामुळे हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे.खरंतर देशात प्रत्येक गोष्टीसाठी सरकारने यंत्रणा स्थापन केलेली आहे. माणसांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस तसे वन्य जिवांच्या सुरक्षीततेसाठी वन विभागाची स्थापना केलेली आहे. परंतु, त्यांच्याकडून वणवे लागू नयेत म्हणून कोणतीही उपाययोजना राबविली जात नसल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे.

जंगलांत वणवे लागण्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे झाडाच्या सुकलेल्या फांद्या एकमेकांना घासून त्यातून आगीची ठिकणगी निर्माण होते. ती ठिणगी सुक्या गवतावर किंवा पाळापाचोळ्यावर पडली की ते पेट घेते. आणि वाऱ्याच्या सहाय्याने संपुण जंगलभर पसरत जाते. आणि दुसरे कारण म्हणजे मानवाने आपल्या फायद्यासाठी डोंगर पायथ्याशी लावलेल्या आगीचा जोरात सुटलेल्या वाऱ्यामुळे मोठा भडका उठतो आणि ती सुकलेल्या गवतात जाऊन पेट घेते. हळू हळू ती आग रुद्रावतार धारण करते आणि संपूर्ण डोंगर किंवा जंगले गिळंकृत करते. त्यामुळे डोंगरांवरील किंवा जंगलांतील वनसंपदा नष्ट होते. त्यामुळे येथील औषधी वनस्पती, हंगामी फळे, फुले आणि भाज्या यांसह पशु-पक्षी, वन्य प्राणी, सरपटणारे प्राणी व किटक यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हे सर्व निसर्ग चक्र सुरळीत सुरू ठेवण्याचे काम करत असतात. परंतु, त्यांचेच अस्तित्व धोक्यात येत असेल तर निसर्गाचा समतोल राखला जाणार कसा, असा प्रश्न सध्या सर्वसामान्यांसमोर उभा राहत आहे. भविष्यातही असेच चालु राहिले तर मोठ्या नैसर्गिक संकटांना सामोरे जाण्याची चिंता निसर्गप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

एखाद्या डोंगराला वणवा लागल्याचे समजले की वन विभागाकडून काही प्रमाणात ती आग विझविण्यासाठी प्रयत्न केले जातात. काही ठिकाणी वणवे रोखण्यासाठी प्रयत्न देखील केले जातात. परंतु, तरी देखील वन विभागाला अपयश येत असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. जास्तीकरून हे वणवे सायंकाळच्या सुमारासाच दिसतात. आधिच वन विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असून पुरेसी यंत्रणा नाही. त्यामुळे सायंकाळी लागलेली आग वन विभाग विझवणार तरी कशी? असा प्रश्न निसर्गप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे. पुढेही अशीच परिस्थिती कायम राहिल्यास डोंगरावरील मानवी वस्तींसह वन्य जीव आणि वृक्षांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. त्यामुळे वन विभागाने या 'वणवा' नावाच्या संकटाला दुर फेकण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजे आहे. वणवा विझविण्यासाठी वेळेवर त्या ठिकाणी पोहोचता येत नसेल तर त्या ठिकाणी आग पसरू नये यासाठी तेथे उपाययोजना करणे गरजेचे आहे. किंवा स्थानिकांना वणवा लागू नये आणि लागल्यास काय उपाययोजना करावी, यासाठी मार्गदर्शन करणे गरजेचे असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे.

लोकसंसद

## नवोदित खेळाडूंवर कोट्यवधींची उधळण!

अबुधाबीच्या एतिहाद एरिनामध्ये नुकत्याच पार पडलेल्या टाटा आयपीएल २०२६ मिनी लिलावात दहा संघांच्या फ्रेंचायजींनी देशी परदेशी मिळून एकूण ७७ खेळाडूंची खरेदी केली. या लिलावाचे वैशिष्ट्य म्हणजे ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन याच्यावर सर्वात मोठी बोली लागली आणि त्याला कोलकाता नाइट रायडर्सने २५.२० कोटी रुपयांना आपल्या संघात घेतले. तो आजवरच्या 'आयपीएल' इतिहासात सर्वांत मोठी बोली लागलेला परदेशी खेळाडू ठरला. तर चेन्नई सुपर किंग्स या संघाने राजस्थानचा १९ वर्षीय यष्टिरक्षक फलंदाज कार्तिक शर्मा आणि उत्तर प्रदेशचा २० वर्षीय अष्टपैलू खेळाडू प्रशांत वीर या दोन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण न केलेल्या नवोदित आणि अपरिचित खेळाडूंना प्रत्येकी १४.२० कोटी रुपयांच्या रकमेसह आपल्या संघात सामावून घेतले. नवोदित खेळाडूंसाठीची आजवरची ही विक्रमी रक्कम ठरली. या लिलावाने अकिब नबी दार (८.४० कोटी, दिल्ली कॅपिटल्स), मंगेश यादव (५.२० कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु), तेजस्वी सिंह दहिया (३ कोटी, कोलकाता नाइट रायडर्स), अक्षत रघुवंशी (२.२० कोटी, लखनऊ सुपर जायंट्स), सलील अरोरा (१.५० कोटी, सनरायजर्स हैदराबाद) या नवोदित खेळाडूंनाही कोट्याधीश बनवले. या मिनी लिलावात अनेक खेळाडू करोडपती झाले. अशा परिस्थितीत २२ मार्च ते २५ मे २०२६ दरम्यान रंगणारा २०२६ चा आयपीएलचा १९ वा हंगामही सालाबादप्रमाणे रंगतदार होणार यात शंका नाही.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# स्वप्नांना पंख देणारे स्थलांतर

दरवर्षी १८ डिसेंबरला संपूर्ण जगात 'आंतरराष्ट्रीय स्थलांतरित व्यक्ती दिवस' साजरा केला जातो. १८ डिसेंबर १९९० रोजी संयुक्त राष्ट्रसंघ आमसभेने स्थलांतरित श्रमिकांच्या अधिकारांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या संरक्षणार्थ आंतरराष्ट्रीय कराराला अंगिकारले होते.

या घटनेला चिन्हांकित करण्यासाठी ४ डिसेंबर २००० ला संयुक्त राष्ट्रसंघ आमसभेने जगात स्थलांतरित व्यक्तींची वाढती संख्या लक्षात घेता त्यांच्या अधिकारांविषयी जागृती निर्माण करण्याच्या हेतूने दरवर्षी '१८ डिसेंबर' या दिवशी हा दिवस साजरा केला जावा, असे आवाहन करण्यात आले होते.

१९ सप्टेंबर २०१६ रोजी संयुक्त राष्ट्रसंघ आमसभेने निर्वासित आणि स्थलांतरित लोकांसंबंधित प्रथम शिखर परिषदेत निर्वासित आणि स्थलांतरितांचे संरक्षण वाढवण्यासाठी निश्चित केलेल्या प्रतिबद्धतेच्या संचाचा स्वीकार केला. हे दस्तऐवज 'निर्वासित आणि स्थलांतरित व्यक्तींसाठी न्यूयॉर्क घोषणापत्र' म्हणून देखील ओळखले जाते. जनगणना व राष्ट्रीय नमुना पाहणीने स्थलांतरणाची सात कारणे मांडली आहेत. काम व रोजगारीसंबंधित व्यापार, शिक्षण, विवाह, जन्माची वेळ, कुटुंबाबरोबर व इतरांबरोबर स्थलांतरण, दोनही गणना करणाऱ्यांच्या मते फक्त ३ टक्के भारतीयांनीच नोकरीसंबंधित कारणासाठी आपले नेहमीचे राहण्याचे ठिकाण सोडले आहे, पण जनगणना व राष्ट्रीय नमुना पाहणीतील विश्लेषणानुसार असे दिसून आले आहे, की १९९१ ते २००१ या दहा वर्षांच्या काळात सर्व आंतरराष्ट्रीय (इंटरस्टेट) स्थलांतरणांपैकी ३२ टक्क्यांनीच काम वा नोकरीसाठी स्थलांतरण केल्याची नोंद आहे. गेल्या १५ वर्षांत यांना अनेक वेळा भेदभाव व हल्ल्यांना महाराष्ट्रात सामोरे जावे लागले. उत्तर प्रदेशातून आलेल्या स्थलांतरितांचे विशेष पसंतीचे राज्य आहे महाराष्ट्र. १९९० च्या दशकापासून बिहारमधील श्रमिक मोठ्या संख्येत पंजाबमध्ये स्थलांतरित झाले आहेत.

मुख्य कारण आहे पंजाबातील शेतमजुरांचा तुटवडा. येथेही बिहारी स्थलांतरितांना वांशिक व सामाजिक भेदभावाचा, शारीरिक हल्ल्याचा जाच सहन करावा लागतो. अनेक क्षेत्रीय अभ्यासांतून असे दिसून आले आहे, की ओदिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश आणि बिहार या चार राज्यांमधून फार मोठ्या प्रमाणावर मजूर देशातील वाढत्या बांधकाम व्यवसायात रोजगारीस जात आहेत. बिहारमध्ये सामाजिक सुरक्षा योजना-शासकीय शैक्षणिक संस्था, सार्वजनिक आरोग्य सोयीसुविधा, सार्वजनिक वितरण व्यवस्था जनसामान्यांपर्यंत, दीनदुबळ्यांपर्यंत पोहोचूच शकल्या नाहीत. त्यामुळे स्थलांतर हेच सामाजिक गतिक्षमतेचे (सोशल मोबिलिटी) साधन झाले आहे. जमीन सुधारणांचाच अभाव असल्यामुळे दलित, इतर मागासलेल्या वर्गात शेतमजुरांची संख्या अधिक आहे.

स्थलांतरित होऊन शहरी गरीब म्हणून राहणाऱ्यांत हे भूमिहीन शेतमजूर संख्येने जास्त आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार बिहारमधून जवळजवळ १७ लाख नागरिकांनी स्थलांतर आधीच्या दशकात (१९९१ ते २००१) केले होते. पाटणा येथील 'बिहार इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक स्टडीज' या संस्थेच्या पाहणीनुसार सर्वात अधिक संख्येत स्थलांतरण झाले ते पंजाबकडे (२६.३६ टक्के), त्यानंतर दिल्लीकडे (२१.२४ टक्के), महाराष्ट्राकडे (१५.०६ टक्के), हरयाणाकडे (११.७२ टक्के) आणि पश्चिम बंगालकडे (५.८६ टक्के). स्थलांतरामुळे बिहारमध्ये सामाजिक स्तरावर सारख्या पातळीवर आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

भारताचे ऐक्य व एकात्मता कायम ठेवण्यासाठी एक स्थलांतर धोरण असण्याची नितांत आवश्यकता आहे. आपली विकास उद्दिष्टे गाठण्यासाठी, गरिबांना विकासानुकूल, श्रमिक नियमन आणि सार्वत्रिक अधिग्रहण ही त्या धोरणाची आधारभूत तत्त्वे आहेत, स्थलांतरित लोक हे उपरे आहेत, असे मानून कोणत्याही शहराचा, राज्याचा विकास होणार नाही. रोजगारीसाठी, उदरनिर्वाहासाठी प्रत्येक भारतीय नागरिक हा भारतात कोठेही जाऊ शकतो हे मान्य व्हायला हवे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ डिसेंबर

१) श्री.मुश्ताक अमीर घट्टे चावडी मोहल्ला, अलिबाग, १८-१२-१९५५

श्री.मंगेश शंकर भगत अलिबाग १८-१२-१९६२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल, उचेडे पेण**

**द्रिती प्रथमेश पाटील, वाढदिवस, मुंबई**


**कै. सुमित्रा रघुनाथ कोलते, स्मरणार्थ, पिंपळभाट अलिबाग**

## विभागस्तरीय स्पर्धेसाठी अजय कापसेंची निवड

**कोलाड :** रोहा तालुक्यातील रा.जि.प.शाळापुई आदिवासीवाडी येथील उपशिक्षक अजय अविनाश कापसे यांची विभागीयस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. उपशिक्षक अजय कापसे यांनी रोहा तालुका स्तरावर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. यामुळे त्यांची सोमवार दि.२२ डिसेंबर रोजी डी.एस. हायस्कूल, एम.दि. कुलकर्णी सायन पश्चिम येथे सकाळी १०वा. होणाऱ्या विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. याबाबतचे पत्र रोहा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांच्या तर्फे देण्यात आले आहे. या निवडीबद्दल अजय कापसे यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुरूड ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**● शवविच्छेदनासाठी डॉक्टरच नाहीत**



**। मुरुड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील काशिद आदिवासी वाडी येथे एक धक्कादायक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. आदिवासी समाजाच्या मृत व्यक्तीचा मृतदेह मुरूड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. मात्र, शवविच्छेदनासाठी डॉक्टरच नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मुरूड ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुरूड तालुक्यातील काशिद आदिवासी वाडी येथील एक व्यक्ती मजुरीच्या कामासाठी घराबाहेर पडली होती. मात्र ती व्यक्ती रात्रभर घरी न परतल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. सकाळी पत्नीने व नातेवाईकांनी परिसरात शोध घेतला असता, त्या व्यक्तीचा मृतदेह एका नाल्यात आढळून आला. याची माहिती तात्काळ पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आणि मृतदेह मुरूड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. मात्र, येथेच एक धक्कादायक वास्तव समोर आले. सकाळी साधारण ११ वाजता मृतदेह रुग्णालयात आणल्यानंतर, शवविच्छेदनासाठी कोणताही डॉक्टर उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकारामुळे नातेवाईक हादरून गेले. मृत व्यक्तीचे नातेवाईक अंकुश पवार (रा. काशिद) यांनी आदिवासी कातकरी समाज संघटनेचे अध्यक्ष भगवान शंकर नाईक यांना फोन करून ही गंभीर बाब सांगितली. तर भगवान नाईक यांनी स्वतः डॉक्टरांशी संपर्क साधला असता, ''इथे शवविच्छेदन करण्यासाठी कोणीच नाही, तुमच्याकडे कोणी डॉक्टर असेल तर पाठवा,'' असे उत्तर डॉक्टरांकडून मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांवर आधीच दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना, शवविच्छेदनाअभावी मृतदेह तासन्तास तसाच पडून राहणे हे प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे भयावह चित्र आहे. या घटनेमुळे मुरूड ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित प्रशासन व आरोग्य विभागाने तातडीने दखल घेऊन जबाबदारांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

### मृतदेह तासन्तास तसाच

या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने ग्रामीण रुग्णालयशी संपर्क साधला असता वैद्यकीय अधिकारी प्रफुल्ल धुमाळ यांनी सांगितले की, मृतदेह ११ वाजताच्या सुमारास आला. पोलिसांनी पंचनामा करून २ वाजता ताब्यात दिला. परंतु, शवविच्छेदन करण्यासाठी (कटर) म्हणजे शवविच्छेदक पोस्ट खाली असल्याने मृतदेह तासन्तास तसाच पडून होता. त्यानंतर अलिबाग जिल्हा रुग्णालयातून शवविच्छेदक (कटर) मागविण्यात आला. संध्याकाळी सहा वाजता शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

## चांगभलं देवस्थान येथे महाअभिषेक भंडारा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ-माथेरान घाटरस्ता येथे असलेलया श्री चांगभलं देवस्थान येथील वार्षिक उत्सव आणि महाअभिषेक सोहळा पार पडला. टॅक्सी संघटना, कुळी संघटना आणि मुलवासी अश्वपाल संघटना यांच्या माध्यमातून साजरा होत असतो. दरम्यान या तिन्ही संघटनामधील सदस्य आणि त्यांचे कुटुंबीय हे बहुसंख्येने भंडारा महाप्रसाद घेण्यासाठी उपस्थित असतात.

नेरळ-माथेरान घाटातील वाघाड वळणे आणि तीव्र उत्तर यामुळे हा घाटरस्ता वाहनचालक यांच्यासाठी अवघड समजला जातो. या घाटातील प्रवासी टॅक्सी आणि सर्व वाहनांचा प्रवास सुखकर व्हावा, अपघातामुक्त व्हावा यासाठी नेरळ माथेरान टॅक्सी संघटना, माथेरान दस्तुरी नाका येथील कुळी तसेच मुलवासी अश्वपाल संघटना यांच्या माध्यमातून वर्षातील डिसेंबर महिन्यात येणारी तिसऱ्या मंगळवारी अभिषेक आणि भंडारा उत्सव आयोजित केला जातो. मार्गशीर्ष महिन्याला सुरुवात झाली की, नेरळ माथेरान टॅक्सी चालक-मालक संघटना तसेच माथेरानमध्ये असणारे अश्वपाल संघटना कुली संघटना या तीन संघटना एकत्र येऊन माथेरानमध्ये असणारे जागृत देवस्थान विसरण्यात चांगभले या देवाची पूजा व महाभिषेक भंडारा केला जातो. चांगभलं देवाचे दर्शन घेण्यासाठी माथेरानमधून नागरिक येत असतात. तसेच नेरळवरून सुद्धा मोठ्या प्रमाणात नागरिक चांगभले या देवाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. अभिषेक व भंडारा झाल्यानंतर चांगभले देवस्थानमध्ये दर्शनाला सुरुवात होते.

## मुलांना मैदानावर खेळायला प्रोत्साहन द्याः पो.नि. सचिन हिरे

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

चार भिंतीत अडकलेलं बालपण आणि मोबाईलच्या स्क्रीनवर चालणारे आभासी खेळ ही आजच्या पिढीसाठी धोक्याची घंटा आहे. मोबाइल गेमच्या व्यसनामुळे मुले एकलकोंडी, तणावग्रस्त होत आहेत. हे चक्र थांबवायचे असेल तर मैदानच त्यांची 'लाइफलाइन' ठरली पाहिजे, असा वास्तववादी संदेश खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी दिला. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या संयुक्त वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जनता विद्यालय प्राथमिक व पूर्वप्राथमिक शाळा, बी.एल. पाटील तंत्रनिकेतन के.एम.सी.कॉलेज, शिशुमंदिर गगनगिरी इंटरनॅशनल स्कूल या सर्व शाखांच्या एकत्रित क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी पोनि सचिन हिरे यांनी पालकांना इशारा दिला की, शिक्षणाच्या स्पर्धेत पाल्यांना आपण मैदानापासून दूर खेचतो आणि त्यांची पावलं मोबाईल गेमकडे वळतात. मोबाईल स्क्रीनवरील विजय खरा नसतो, पण त्यातून निर्माण होणारा ताण मात्र खरा असतो! पालकांनी मुलांना मैदानावर खेळायला प्रोत्साहन देणं हीच खरी गुंतवणूक आहे.

## लाचखोर अधिकारी ताब्यात

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर तालुक्यातील नवापूर ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी राजेश संखे याला वीस हजारांची लाच घेताना मंगळवारी रंगेहाथ पकडण्यात आले. नवापूर गावामध्ये एक कृषी पर्यटन केंद्र असून कृषी पर्यटन केंद्राच्या मालकाने तरंग तलाव, कृषी पर्यटन त्यामध्ये पर्यटकांसाठी तीन खोल्या, उपाहारगृह व न्याहारी गृह सुरू करण्यासाठी नवापूर ग्रामपंचायतीकडे ना हरकत दाखला मिळण्याकरिता विनंती अर्ज केला होता. मात्र ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक राजेश संखे यांनी ना हरकत न देता तक्रारदार यांच्याकडे २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. ती लाच स्वीकारताना पालघरच्या लाचलुपत प्रतिबंधक विभागाने संखे याला रंगेहाथ पकडले. त्याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध सातपाटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मूल्यविमर्शावर राष्ट्रीय परिषद उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (पीएम-उषा), महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आधुनिक हिंदी साहित्यातील मूल्यविमर्श : परंपरा, परिवर्तन आणि आव्हाने' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषद शनिवारी (दि.१३) उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली.

या राष्ट्रीय परिषदेत देशातील पाच राज्यांतील विविध महाविद्यालयांमधील ७१ हिंदी प्राध्यापक, १२ संशोधक विद्यार्थी आणि ६० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. परिषदेत आधुनिक हिंदी साहित्याच्या बदलत्या प्रवाहांवर, मूल्यसंस्थांवर आणि समकालीन सामाजिक-सांस्कृतिक आव्हानांवर सखोल व अभ्यासपूर्ण मंथन झाले. विविध सत्रांमध्ये नामवंत अभ्यासकांनी आपले विचार मांडत समृद्ध चर्चा घडवून आणली.

परिषदेचे मार्गदर्शन डॉ. किरण कुलकर्णी, सचिन निंबालकर, अ‍ॅड. राजीव अशोक साबळे, डॉ. शीतला प्रसाद दुबे, प्रो. संतोष मोटवानी यांनी केले. सत्राध्यक्ष म्हणून प्रो. मोहसिन खान, प्रो. सुरेश शेलके, प्रो. एस.ए. मंजूनाथ यांनी भूमिका पार पाडली. तसेच प्रो.युवराज मूल्ये, प्रो.संगीता चित्रकोटी, प्रो. ईश्वर पवार, डॉ. भारती, प्रो. मिलिंद साळवी, प्रो. सातप्पा लहू चौहान, डॉ. छाया जाधव, प्रो. एम. जी. इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## डॉ. कारभारी काळेंना पुरस्कार

**। महाड । प्रतिनिधी ।**

नवी दिल्ली देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या वीरांच्या स्मरणार्थ साजरा होणाऱ्या विजय दिनाचे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे कुलगुरू प्रा.डॉ. कारभारी काळे यांना प्रतिष्ठेच्या प्राइड ऑफ नेशन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मंगळवारी (दि.१६) नवी दिल्ली येथे एनडीएमसी कन्वेंशन सेंटरमध्ये व्हेटरन्स इंडिया संस्थेच्या वतीने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात डॉ.कारभारी काळे यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला. या दिमागदार सोहळ्याला देशातील विविध क्षेत्रांतील दिग्गज उपस्थितीत होते. प्रा. डॉ. कर्नल कारभारी काळे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे शैक्षणिक क्षेत्रातून आणि विद्यापीठ परिवारातून त्यांचे अभिनंदन होत आहे. हा सन्मान केवळ त्यांचाच नव्हे तर तंत्रशिक्षण क्षेत्राचा गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## मुरुडमध्ये तलाठी संघटनेचा ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार




**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेच्या वतीने सोमवार दि. १५ डिसेंबरपासून राज्यभर आयटी उपकरणांवरील ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला आहे. या राज्यस्तरीय व्यापक आंदोलनाचा एक भाग म्हणून मुरुड तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी तहसिलदार आदेश डफळ यांची भेट घेऊन तालुक्याच्या संपूर्ण टीमच्या वतीने निवेदन सादर केले. यावेळी राज्यस्तरीय निवेदनही तहसिलदारांकडे देण्यात आले आहे.

मुरुड तालुका ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष अनिल ढोले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी संजय बिक्कड (मुरुड), तुषार काकडे (बोर्ली), मंगेश इग्रुळकर (नांदगाव), उपलेखापाल संतोष कचरे, तलाठी संघटनेचे उपाध्यक्ष तथा मुरुड ग्राम महसूल अधिकारी राहुल जाधव यांसह सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

तलाठी संघटनेच्या मागण्या मान्य होईपर्यंत सर्व ग्राम महसूल व मंडळ अधिकारी आपली डिजिटल सिग्नेचर (डीएससी) तहसिल कार्यालयात जमा करून संपूर्ण ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकत असल्याचे संघटनेने निवेदनातून स्पष्ट केले आहे. दरम्यान, या आंदोलनामुळे ७/१२, ८-अ दाखला प्रणाली, ई-फेरफार ई-फिक पाहाणी नोंदणी यांसारख्या महत्वाच्या अनिलाईन सेवांवर तात्पुरता परिणाम होण्याची शक्यता आहे. तलाठी संघटनेने शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

**विद्यार्थ्यांसाठी बनतोय आकर्षण | संतोष नाटीकरांच्या व्हिडिओला उत्स्फूर्त प्रतिसाद**

# 'झटपट बोलूया इंग्रजीत' उपक्रम यशस्वी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खाड्याचा पाडा या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक हे बालभारती अभ्यास मंडळाचे सदस्य आहे. इंग्रजी विषयाचे तज्ञ् म्हणून अभ्यास मंडळावर नियुक्त असलेले शिक्षक संतोष नाटीकर यांनी इंग्रजी नवोपक्रममधील एका वेगळ्या बदलाचा व्हिडीओ बालभारती अभ्यास मंडळावर शेअर केला. दरम्यान उपक्रमशील शिक्षक संतोष नाटीकर यांच्या या व्हिडीओला राज्यभरातील शिक्षक यांच्याकडून प्रचंड प्रतिसाद लाभला आहे.

बालभारती अभ्यासमंडळ सदस्य संतोष नाटीकर हे जिल्हा परिषदशाळा खाड्याचा पाडा येथील उपक्रमशील शिक्षक काम पाहतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी संभाषण कौशल्याचे महत्व असाधारण आहे. इंग्रजी भाषा बोलण्यासंबंधी एक रामबाण उपक्रम म्हणजे 'झटपट बोलूया इंग्रजीत' असा हा उपक्रम आहे. कर्जत तालुक्यातील खाड्याचापाडा येथील शाळेवर कार्यरत शिक्षक संतोष नाटीकर यांचा हा उपक्रम सध्या कर्जत तालुक्यातील अनेक अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे आकर्षण बनला आहे. मुलांनी आकलनपूर्वक अस्खलित इंग्रजी बोलावे यासाठी २०-६० दिवसाचा हा उपक्रम अनेक शाळांमध्ये यशस्वी ठरलेला दिसतो आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी असे उपक्रम शाळांमध्ये राबवणे गरजेचे आहे. याबाबत पंचायत समिती कर्जतचे गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे यांनी या नवोपक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यात हा उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व इंग्रजी विषयाचे ज्ञान वाढण्यास मदत करणारा ठरणार आहे. संतोष नाटीकर यांनी आजपर्यंत अनेक शाळांमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले आहे.



### विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला

इंग्रजी विषय अभ्यासमंडळ सदस्य संतोष नाटीकर यांनी आपल्या इंग्रजी विषयाच्या ज्ञानाचा फायदा सर्वसामान्य व तळागाळातील विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी एक नवोपक्रम राबविला आहे. या उपक्रमामुळे वाडीवस्तीवरील, गाव खेड्यातील, तांडा, पाड्यावरील विद्यार्थ्यांना खूप फायदा झाल्याचं सिद्ध झाले आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची भीती दूर होण्यास मदत झाली असून, त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. संपूर्ण राज्यभरातील विद्यार्थ्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या असून आम्हाला या नवोपक्रमाचा खूप फायदा झाल्याचे सांगितले.

## निवडक



### ग्रामस्थांनी बांधला वनराई बंधारा

**तळा :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायत वाशी हवेली येथे ग्रामस्थांकडून नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला. भात कापणी झाल्यानंतर उन्हाळी पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी ग्रामस्थांकडून नदीवर वनराई बंधारे बांधण्यात येतात. या बंधाऱ्यांमुळे उन्हाळी भाजीपाला तसेच पशु-पक्षांना पाण्याची कमतरता जाणवत नाही. तसेच, या बंधाऱ्यामुळे नदीतील पाणीसाठा वाढून शेतकरी व ग्रामस्थांना पाणी उपलब्ध होणार असून गावाच्या विकासाला चालना मिळणार आहे. ग्रामस्थांनी दगड, माती व सिमेंटच्या पिशव्यांच्या साहाय्याने श्रमदानातून हा बंधारा बांधून पूर्ण केला. याप्रसंगी कृषी विभागाचे गोविंद पाशीमे, वाशी हवेलीचे माजी सरपंच, माजी उपसरपंच, माजी सदस्य, गावचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांसह ग्रामस्थ व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### न्हावे स्मशानभूमीत स्वच्छता अभियान



**चणेरा :** रामानंद संप्रदाय प्रेरित उत्तर रायगड जिल्हा अंतर्गत रोहा तालुक्यातील संतसंग सेवाकेंद्र न्हावे-सोनखार यांच्या वतीने न्हावे गावातील स्मशानभूमी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमांतर्गत स्मशानभूमीतील झाडाझुडपांची साफसफाई, कचरा संकलन व परिसर स्वच्छ करण्यात आला. संतसंग सेवाकेंद्राच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून सामाजिक बांधिलकी जपत आपले योगदान दिले. स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती निरंतर चालणारी चळवळ असावी, असे मार्गदर्शन खारकर महाराज यांनी यावेळी केले. भक्तगणांनी दाखवलेला एकत्रीत सेवेचा भाव, निस्वार्थ परिश्रम आणि सामाजिक जाणीव खरोखरच मनाला स्पर्श करून जाणारी आहे. या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असा संकल्प सेवाकेंद्राच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

### आगरी साहित्य पुरस्कार वितरण




**चिरनेर :** अखिल भारतीय आगरी महोत्सव या समाज सोहळ्याचे आयोजन आगरी युथ फोरम या संस्थेतर्फे शुक्रवार दि.१२ ते शुक्रवार दि.१९ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. या महोत्सव सोहळ्यामध्ये कला, नृत्य अभिनय व विविध क्षेत्रातील प्राविण्य संपादन केलेल्या समाज बाधंवाना आगरी समाज पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यामध्ये दि.१५ डिसेंबर रोजी रात्री ८ वा. आगरी समाज भुषण पूरस्कार वितरण समारंभ करण्यात आला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहूणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री जगन्नाथ पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमूख, जेष्ठ पत्रकार समन्वयक राजेंद्र हुंजे, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष मा. गुलाबराव वझे व संमेलाध्यक्ष उपस्थित होते. या समाज सोहळ्यामध्ये जेष्ठ साहित्यिक रायगड भुषण प्रा. अ‍ॅड. चंद्रकांत मढवी यांना त्यांच्या अगरायन या कथासंग्रहास स्व. नकुल पाटील स्मृती आगरी साहित्य पुरस्कार २०२५ हा विशेष पुरस्कार डॉ. लक्ष्मीकांत देशमूख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### उपसरपंचपदी सोनाली महाडिक बिनविरोध



**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागात असलेल्या भोईघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सोनाली संजय महाडिक यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे. भोईघर ग्रामपंचायतीचे प्रसाद चौलकर यांनी ठरल्याप्रमाणे उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सोनाली महाडिक यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी संतोष नागोठकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. उपस्थितनी सोनाली महाडिक यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष ठाकूर प्रथम



**उरण :** उरण तालुक्यातील पिरकोन येथे आयोजित उरण तालुका विज्ञान प्रदर्शनांतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत जुनिअर कॉलेजचा विद्यार्थी हर्ष जगदीश ठाकूर (११वी विज्ञान, ब) याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे संबंधित विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. हर्षच्या या यशामागे प्रा. अरुण देवरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## निवडक



### श्रीवर्धनमध्ये ६९९ प्रकरणे निकाली

**दिघी** : श्रीवर्धन लोकअदालतमध्ये एकूण १७९५ प्रकरणे सुनावणीसाठी ठेवण्यात आले. त्यापैकी ६९९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. श्रीवर्धन प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी समीर शेख, वकील संघटनेचे पदाधिकारी व सदस्य राजेश वावेकर, स्वानंद दातार, अतुल चौगुले, मनिष लाड, संतोष सापते, विठोबा पाटील, गोदावरी करडे, शैलेश चांदोरकर, तेजस ठाकूर, आंबिका करडे, कार्यालयीन कर्मचारी व पक्षकार यांनी लोकअदालत यशस्वी करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. श्रीवर्धन न्यायालयात प्रलंबित २०३ केसेस लोकन्यायालयात ठेवण्यात आल्या. त्या पैकी ५८ केसेस निकाली निघाल्या असून १०४४३६५ इतक्या रक्कमची वसुली झाली आहे. तसेच प्री लि्टीगेशनच्या १५९२ पैकी ६४१ प्रकरणे निकाली निघाली आहेत वा त्यामध्ये एकूण रक्कम रुपये १३७५६८४ रक्कम वसूल झाली आहे. लोक नायायल्यात एकूण दाखल १७९५ प्रकरणापैकी ६९९ प्रकरणे निकाली निघाली आहेत.



### विद्यार्थ्यांकडून वॉटर प्युरिफायर भेट

**मुरूड** : जंजिरा विद्यो मंडळाच्या सर एस. ए. हायस्कूलमधील जुनी अकरावी एसएससी बॅच १९७५ विद्यार्थ्यांकडून बुधवारी विद्यालयाला जलशुद्धीकरण यंत्र अर्थात वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला. सदर वॉटर प्युरिफायरचे उद्घाटन सचिव उल्हास चौलकर यांनी श्रीफळ वाढवून व फीत कापून केले. या प्रसंगी जंजिरा विद्यामंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, संचालक मंडळाचे सदस्य उदय दांडेकर, हायस्कूलचे पर्यवेक्षक भास्कर मोरे, माजी मुख्याध्यापक तथा सदर बॅचमधील एक विद्यार्थी उदय गद्रे, मोहन पाटील, गणेश सुकाळे, उदय खोत, उदय चौलकर, पांडुरंग आगरकर, दिप्ती दांडेकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना शासनाकडून सद्या शाळांना अनुदान मिळत नाही. शिक्षकांची भरती देखील बंद करण्यात आल्यामुळे शाळा अशा चालवायच्या असा प्रश्न संचालक मंडळाला पडत आहे. देशाच्या भावी पिढ्या घडविणाऱ्या शिक्षण क्षेत्राकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करताना शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी यथाशक्ती शाळेला मदत करण्याचे आवाहन केले.

### वेलशेत येथे श्रमसंस्कार शिबीर

**नागोठणे** : बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य नरेंद्र जैन यांच्या हस्ते होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला रोहा येथील डॉ. सी डी देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, प्रा. डॉ. संदेश गुरव, पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संतोष कोळी, प्रशासक शांतेश जुजगार, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अनिल काळे, ॲड. सोनल जैन, पिगोंडेचे ग्रामपंचायत अधिकारी विजय अहिरे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विकसित भारतासाठी युवकांचे योगदान या थीमवर आधारित या शिबिरात ग्राम स्वच्छेतेबरोबरच विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

### महिलेचा हार चोरांनी केला लंपास

**पनवेल** : महिलेच्या गळ्यातील आठ तोळे वजनाचा सोन्याचा हार आणि सोनसाखळी खेचून दोघेजण दुचाकीवरून पळून गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुंदा गावंड( वय ४५) या करंजाडे, सेक्टर आर ५ येथे राहत असून, त्या लक्ष्मीनारायण मंदिरात लग्नाला जात होत्या. रात्री पावणेदहाच्या सुमारास वाघिवली वाडी येथून चालत जात होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून दोघे आले आणि त्यांनी त्यांच्या गळ्यातील आठ तोळ्यांचा हार आणि साखळी जबरदस्तीने खेचली. या झटापटीत कुंदा जमिनीवर पडल्या.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४
- हातगाडी विकणे आहे. संपर्क : नम्रता -७७४४०९८५५४
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- विद्यानगर अलिबाग येथे कॉटेजमध्ये कामाकरीता कुक, महिला पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६/८३९०४२४२२२
- अलिबागपासून २१ किमी अंतरावर रामराज राजेवाडी येथे योग्य दरात २० गुंठे/३० गुंठे शेती मिळकत विकणे आहे. मो.नं. ८८०५३३६६१०,९१५८४३८२९२
- कॅन्टीनमध्ये अनुभवी चायनीज कूक, कूक साऊथ इंडियन, समोसा, वडा, भजी, फडकावाला, सुपरवायझर, मोरीवाला पाहिजे. अलिबाग कंपनी येथे मो. ८८५०७२३३७७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




# वनविभाग अडकला समस्यांच्या पिंजऱ्यात

## यंत्रणा ठरतेय कुचकामी; पिंजरे, गनचा अभाव

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड व ठाण्याचा वनविभाग सध्या समस्यांच्या पिंजऱ्यात अडकला आहे. बिबट्यासह रानडुक्कर, वानर, हरीण व अन्य प्राणी नागरी वस्तीत शिरतात तेव्हा त्यांना पकडण्यासाठी वनखात्याच्या कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडते. सध्या या विभागाकडे ना पिंजरे, ना गाड्या, ना डॉक्टर, ना पुरेसे कर्मचारी, ना गन. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करणे मुश्कील झाले आहे. वनविभागाला जाणवत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी सरकार कोणतेही प्रयत्न गांभीर्याने करत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वनखात्याचा कारभार ना घर का ना घाट का असा झाला आहे.

वनविभागाच्या जमिनींवरील वाढत्या मानवी अतिक्रमणामुळे वाघ, बिबटे, हरणे, रानडुक्कर, ससे, वानर, माकडे आणि अन्य विविध प्रकारांतील वन्यजीव आता भक्ष्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरी वस्त्यांमध्ये शिरू लागले आहेत. वन्यजीव कायद्यात दुर्मिळ वन्यप्राण्यांना सरंक्षण दिलेले आहे. त्यामुळे असे दुर्मिळ वन्यजीव नागरी वस्तीत आल्यास त्याला पकडून सुरक्षितरीत्या पुन्हा जंगलात सोडण्यासाठी वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील वनविभागाच्या अखत्यारित अलिबाग, रोहा, ठाणे, डहाणू आदी चार रेंज कार्यरत आहेत. या चारही विभागातील वनविभागाला अनेक अडथळ्यांची शर्यत पार करावी लागते. वनविभागाच्या विविध विभागांतील वनोत्तर जमिनींवर नागरिकांचे अतिक्रमण मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. त्यामुळे सिमेंट कॉंक्रिटची जंगले उभी राहू लागली आहेत. वाढत्या अतिक्रमणामुळे वन्यजीवांना भक्ष्यासाठी नागरी वस्तीत धाव घ्यावी लागत आहे.

वन्यजीव पकडण्यासाठी वनविभागाकडे पिंजरे नाहीत. बोरिवलीच्या नॅशनल पार्कमध्ये पिंजऱ्यासाठी धाव घ्यावी लागते. मात्र नॅशनल पार्कमध्येही पिंजऱ्यांची संख्या अपुरी आहे.यदा कदाचित पिंजरा उपलब्ध झालाच तर पिंजरा वाहतुकीसाठी वनविभागाकडे कोणतेही वाहन नाही. वाहनच नसल्याने पिंजरा वाहतुकीसाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना इतरांकडे आर्जवे करावी लागतात. अधिकाऱ्यांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करण्याची वेळ येते. वनविभागाकडे माकड, वानर, वाघ, बिबट्याला पकडण्यासाठी भुलीचे इजेक्शन देणाऱ्या पुरेशा गन्स नाहीत. वन्यजीवाला पकडल्यास दुर्मिळ प्राण्याचे स्वास्थ तपासणीसाठी पुरेशा प्रमाणात डॉक्टर्स नाहीत.

## शार्विल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन शार्वील स्कुल नेरळ येथे संपन्न झाले. सदर कार्यक्रम त तालुकास्तरीय शैक्षणिक नवोपक्रम पुस्तिका महेंद्र थोरवे आमदार कर्जत खालापूर मतदारसंघ, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, अनंत खैरे गटशिक्षणाधिकारी पं. स.कर्जत, परब गटशिक्षणाधिकारी खालापूर यांच्या उपस्थितीत प्रकाशन संपन्न झाले.



सदर पुस्तकेसाठी तालुक्यातील सर्व उपक्रमशील शिक्षक,तंत्र स्नेही शिक्षक,सर्व केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, समूह साधन केंद्र अधिकारी वर्ग यांनी विशेष सहभाग,योगदान व सहकार्य केले त्याबद्दल विस्तार अधिकारी नारायण सोनवणे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने माझा नवोपक्रम विद्यार्थी स्वयंपूर्णतेकडे या अनुषंगाने विद्यार्थी, शाळा, तालुका एकूण गुणवत्ता विकासामध्ये योगदान देण्याकरिता सदर संकल्पना पूर्ती केली.सदर पुस्तिकेची माहिती स्वरूपात सर्व शिक्षकांना देण्याचा मानस सोनवणे यांनी व्यक्त केला.

उपस्थित मान्यवरांनी तालुक्याच्या या अभिनव संकल्पनेचे स्वागत व कौतुक केले. विज्ञान प्रदर्शनात २०० पेक्षा अधिक विज्ञान प्रतिकृती सादर करण्यात आल्या आहेत. शिवाय मान्यवर पाहुण्यांनी, शिक्षकांनी सदर प्रतिकृतीचे निरीक्षण करून अभिनंदन केले. बहुसंख्य शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रदर्शनात सहभागी करून आनंद द्विगुणित केला.

## विद्यार्थिनींसाठी समुपदेशन कार्यशाळा

**उरण** : उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींसाठी मुली वयात येताना या विषयावर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाली. सदर कार्यशाळेत गव्हाण येथील प्राध्यापिका करुणा तांडेल व तेजल खेडेकर यांनी विद्यार्थिनींना वयात येताना होणारे मानसिक, शारीरिक तसेच भावनिक बदल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यार्थिनींच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

## ‘येत्या ६ महिन्यांमध्ये महानगर गॅसचे जाळे पसरणार’

**। पेण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात २०१५ ला महानगर गॅस लिमिटेडला वायु वितरण नेटवर्क विकसित करण्याचे आदेश मिळाले. तेव्हापासून युध्दपातळीवर रायगड जिल्हयात वायु वितरणाचे काम चालू आहे. रायगड जिल्ह्यात महानगर गॅसचे सावरोळी येथे सिटीगेट स्टेशन असून, त्यामार्फत रायगड जिल्ह्यात वायु वितरण केले जात आहे.

हे वायु वितरण दोन प्रकारचे होत आहे. एक म्हणजे स्वंयपाकासाठी वायु वितरण आणि दुसरे म्हणजे वाहनांसाठी वायु वितरण रायगड जिल्ह्यामध्ये श्रीवर्धन, तळा, मुरुड हे तालुके वगळता सर्व तालुक्यांमध्ये वायु वितरण सुरु असून मार्च २०२६ पर्यंत रायगड जिल्ह्यातील सर्व ठिकाणी महानगर गॅसचे जाळे विणले जाईल. खालापूर, खोपोली, उरण येथे स्टील पाईपच्या सहायाने ऑनलाईन वायु वितरण केले जात असून पेण, अलिबाग आणि माणगाव या तालुक्यांमध्ये पाईपलाईन टाकण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. ते काम मार्च २०२६ पर्यंत पुर्ण होईल. अशी माहिती प्रसार माध्यमांना पेण येथील पत्रकार परिषदेमध्ये जनरल मॅनेजर शितांशू रॉय चौधरी यांनी दिली. यावेळी गुरविंदर सिंग, शितांशू रॉय चौधरी, विवेक सोनार, प्रताप आयरेकर, निरा आस्थाना फाटे आदी उपस्थित होते.

## ‘प्रशासन गाँव की ओर मोहीम प्रभावीपणे राबवावी’



**। रायगड । प्रतिनिधी ।**

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २५ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहांतर्गत प्रशासन गाँव की ओर मोहीम राबविण्यात येणार आहे.

यासप्ताहांतर्गत प्रशासन गाव की ओर हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा आणि नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दृरदूश्यप्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मार्गदर्शन करताना जावळे यांनी सांगितले की या सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओरफ मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

## श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड यांचे तर्फे राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्कार निवासी शिबीर तेलवडे येथे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या श्रम संस्कार निवासी शिबिराची विद्यार्थ्यांनी उत्तम तयारी केली आहे. सदर शिबिरात एडस जन जागृती, सहकारातील संधी, शेतकरी वर्गासाठी शासन योजना, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, शासकीय योजनांची माहिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्वच्छता अभियान व जैववैविधता या विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असल्याची माहिती एनएसएस युनिट १० चे प्रमुख डॉ. श्रीशैल बहिरगुडे यांनी दिली.

## कोकण विभागीय खुली एकांकिका स्पर्धेचे आयोजन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मालवणी भाषेला मराठी रंगभूमीवर सशक्त, धारदार आणि जागतिक दर्जाची ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ साहित्यिक व रंगकर्मी के. गंगाराम गव्हाणकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गव्हाणकर फॅन क्लब व अखिल भारतीय भंडारी समाज महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण विभागीय खुली एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

ही स्पर्धा कोकणाच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करणारी असून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांतील कलावंतांसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार असून या जिल्ह्यांतील सर्व भागांतील हौशी व व्यावसायिक रंगकर्मी, नवोदित कलाकार, लेखक-दिग्दर्शक यांना सहभागी होता येणार आहे.

कोकणच्या मातीत रुजलेल्या लोकभाषा, सामाजिक वास्तव, लोकजीवन, परंपरा व समकालीन प्रश्न यांना एकांकिकेच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यासाठी ही स्पर्धा एक प्रभावी संधी उपलब्ध करून देत आहे.

कै.गंगाराम गव्हाणकर यांनी निवडणूक, वस्त्रहरण यांसारख्या गाजलेल्या नाट्यकृतींमधून मालवणी भाषेची ताकद, तिचा उपरोध, विनोद आणि सामाजिक भान प्रभावीपणे मांडले. त्यांनी केवळ लेखक म्हणूनच नव्हे तर समाजभान जपणाऱ्या विचारवंत रंगकर्मी म्हणून मराठी रंगभूमीला नवे परिमाण दिले.त्यांच्या हयातीतच त्यांनी मालवणी भाषेला आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आणि आज त्यांच्या पश्चातही त्यांचा हा वारसा जिवंत ठेवण्याची जबाबदारी समाजावर आहे.

याच भावनेतून आयोजित करण्यात आलेली ही कोकण विभागीय खुली एकांकिका स्पर्धा म्हणजे केवळ स्पर्धा नसून, गंगाराम गव्हाणकरांच्या विचारांना, त्यांच्या साहित्य परंपरेला आणि मालवणी भाषेच्या सांस्कृतिक सामर्थ्याला दिलेली अर्थपूर्ण आदरांजली आहे. नव्या पिढीतील कलाकारांनी स्थानिक बोली, लोकजीवन आणि सामाजिक प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहावे, त्यातून सशक्त कलाकृती निर्माण व्हाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कोकणातील सात जिल्ह्यांना एकत्र आणणारी ही स्पर्धा सांस्कृतिक ऐक्य, कलात्मक संवाद आणि नवसर्जनाला चालना देणारी ठरेल, असा आयोजकांचा विश्वास आहे. या स्पर्धेमुळे गंगाराम गव्हाणकर यांचे कार्य, आणि मालवणी भाषेचा ठसा नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, तसेच कोकणातील रंगभूमीला नवी दिशा व ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्पर्धेच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील.

खालापूर पोलिसांची यशस्वी कामगिरी | दोन आरोपी अटकेत, दोन जण फरार

# सीसीटीव्हीमुळे आरोपी केले जेरबंद

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर चोरीची घटना घडली होती, त्याचा पाठपुरावा खालापूर पोलिसांनी करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्हेगारांची पाळेमुळे मुंबई डोंगरी येथून खोदून काढली.

गुन्हेगार मुंबई येथील तणावग्रस्त डोंगरी परिसरात असल्याची माहिती मिळताच रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक रायगड अभिजीत शिवथरे, उप विभागीय पोलीस अधिकारी विशाल मेहुल यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, अशोक जगताप सहाय्यक पोलीस निरीक्षक खालापूर व स्थानिक गुन्हे शाखा, मुंबई पोलीस यांनी आरोपींना मोठ्या शिताफीने मुंबई वाडीबंदर डोंगरी येथून आरोपींना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून मुद्देमाल ही जमा केला. त्यांच्या ह्या कामगिरी बद्दल कौतुक होत आहे.



सदरील घडलेली हकीकत दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई पुणे हायवेवर माडप बोगद्याजवळ घडली होती. फिर्यादी यांचे ताब्यातील माल वाहतूक ट्रकने प्रवास करत असताना मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे वरील माडप टनेल ते कुंभिवली ब्रिजच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसम चोरटा फिर्यादीच्या चालत्या ट्रकमध्ये चढून ट्रकमधील ३२४०० रुपये किंमतीचा अल्युमिनियम आलोयन्स इंगोट्स या मालातील ४५ नग खाली रस्त्यावर टाकून मागील वाहनाने अज्ञात व्यक्ती जमा करत असल्याचे आढळून आले. सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे पोलीस उप निरीक्षक अशोक जगताप व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी बातमीदारांच्या मदतीने अर्जुन शंकर काळे, सोहेल रहीम खान हे दोघेही चारनळ चौक डोंगरी मुंबई येथे गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह मिळून आल्याने त्यांच्याकडे सदर गुन्ह्याची चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले. सदरचा गुन्हा करताना त्यांच्या सोबत असलेले साथीदारांबाबत विचारपूस केली असता त्यांनी संतोष रतन काळे व उम्मी पूर्ण नाव माहीत नसल्याची माहिती दिली. तसेच दोन्ही साथीदार कुठे आहेत व चोरीचा मुद्देमाल कुठे लपवला आहे. याबाबत आरोपींना विचारले असता त्यांच्याकडून समाधानकारक व उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याकारणाने सदर आरोपीस गुन्ह्याचे तपासकामी ११ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली. सदर आरोपींना न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी मिळाली आहे. पोलीस कोठडी दरम्यान सदर गुन्ह्यातील गेलेला माल हा घासबंदर माजगाव मुंबई येथील भंगार दुकान मालक मोहम्मद मुजफ्फर कलील मिस्त्री याचे कडून व उर्वरित माल हा गुन्ह्यात वापरलेल्या इकोकार सह जप्त करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्यात दोन आरोपी अटक असून दोन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

# राहूल पाटील यांचे यश

**उरण :** माँ साहेब मिनाताई ठाकरे वाचनालयात गेल्या दोन वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासिका सुरु करण्यात आली. या अभ्यासिकेमध्ये दररोज अनेक विद्यार्थी अभ्यास करण्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासून रात्रीपर्यंत सलग १०-१२ तास अभ्यास करण्यासाठी बसत आहेत. विविध परिक्षांमध्ये यापूर्वी विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळविले आहे. आताच पार पडलेल्या एमपीएससी परिक्षेमध्ये माजी सैनिक राहूल पाटील यांनी यश मिळविले आहे. राहूल पाटील यांचे कर निरिक्षक या पदाकरिता निवड झाल्याबद्दल ग्रंथपाल संतोष पवार, सहाय्यक कर्मचारी जयेश वत्सराज, ॲड. निरंतर सावंत आणि सर्व विद्यार्थी यांनी सन्मानित केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक गोपाळ विठ्ठल भगत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे जांमरुंग तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ८१/८ | एकुण क्षेत्र ०-३०-०० हे आर पॉ | ०-१२ |
| ८२/२ | एकुण क्षेत्र २-१९-०० हे आर पॉ यापैकी ०-४०-०० हे आर पॉ एवढे | ०-६९ |
| ८१/७ | क्षेत्र एकुण क्षेत्र १-५४-०० हे आर पॉ यापैकी ०-९२-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-७८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १८/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड. कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती रिमा पंडित, रा. बी १३०२, शापुरजी पालनजी विसिनिआ, चांदिवली, साकीनाका, कुर्ला, मुंबई उपनगर, ४०००७२, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३७/१ | ०.२६.०० पो.ख. ०.०२.३० एकुण ०.२८.३० | ४.१९ | श्री. परशुराम भाऊ देशमुख |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १८/१२/२०२५.

सही/-
**ॲड. प्रणित शिवराम भिंगारदिवे**
शॉप नं. ०५, नेमिनाथ शॉपिंग सेंटर, कचेरी रोड,
मुद्रे (बु.), कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
४१०२०१. मो. नं. ९५९४९३०८८९.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिलांनी गाव मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद केलेल्या मिळकतीचे मालक श्री. दामोदर नारायण दुर्गे यांचेकडून सदर मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील अधिकार अभिलेखात खालीलप्रमाणे नमूद असणारी शेती मिळकत**

| भोगवटादार | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. दामोदर नारायण दुर्गे | २० | ४/ब | ०-२४-५० पो.ख. ०-०१-५० एकुण क्षेत्र ०-२६-०० | ०२.०२ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, कुळ, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैरे प्रकारचा हक्क हितसंबंध अगर बोजा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून उपस्थित होणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.
कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १८/१२/२०२५

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
पत्ता कोर्ट व्हिव बिल्डींग, सदनिका क्रं. १०१
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर कर्जत
रायगड मो.नं. ९६०४५४५७७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल संगीता तुकाराम कावले, रा. मेचकरवाडी ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१ यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. विकास रघुनाथ ढाकोळ, रा.घर क्र.४७, वाकरूळ, ता.पेण, जि. रायगड यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | प्लॉट नं | क्षेत्र चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| ११ | २अ/२अ | ३ | २४८ | ४.९६ |

या बिनशेती मिळकतीवर मिळकतीवर बांधलेल्या ''सप्तश्रृंगी अपार्टमेंट'' या इमारतीमधील तळमजल्यावरील ब्लॉक क्र. ००१, क्षेत्र ३४० चौ. फुट अशी निवासी सदनिका मिळकत.

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १८-१२-२०२५

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं -९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. निता जितेंद्र चोणकर व श्री जितेंद्र काशिनाथ चोणकर यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७७/५ एकुण १३.९० गुंठे, सर्व्हे नं ७७/६ एकुण ७.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १८/१२/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली निवासी सदनिका सदर निवासी सदनिकेच्या विद्यमान मालक श्रीमती सुचित्रा कमलाकर पिटकर यांजकडून खरेदी घेणेचा करार केला आहे. खालील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, अलिबाग नगरपरिषद यांचे हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ११२९A/२, ११२९KB, ११३०, ११३०/१ &, ११३०K वर बांधण्यात आलेल्या श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १०४ जिचा अलिबाग नगरपरिषद जुना मालमत्ता क्र. Z1BHA001632 तसेच नवीन मालमत्ता . ALB000001630, क्षेत्र ९२.४७ चौ.मि. ही मिळकत आहे.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १८/१२/२०२५

**ॲड. अक्षय सुधिर म्हात्रे**
''अन्नपुर्णा'', मु.पो.धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.१३४६/२०२५

श्री.अल्पेश मारुती सोनावळे, अर्जदार
रा. कुंभारशेत पो. पाली ता.सुधागड जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कुंभारशेत सामनेवाला
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. अल्पेश मारुती सोनावळे, रा. कुंभारशेत पो.पाली ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वतःचा जन्म दि.०८/०४/१९९७ रोजी मौजे कुंभारशेत ता. सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर अल्पेश मारुती सोनावळे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- १७/१२/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे सुखदरवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथील.**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| गिता राजेंद्र मिरजी राजेंद्र श्रीनिवास मिरजी | २४५/१ | जिरायत ००-६३-०० वरकस ०१-२६-०० पो.ख.००-२३-०० एकुण ०२-१२-०० | ९.६२ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल बळीराम पांडुरंग पाटील यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. १७/१२/२०२५

बळीराम पांडुरंग पाटील
मोबा नं. ९८९२१२६९९३

सही /-
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी-विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ,
ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक विजय नारायण म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - शहाबाज, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९९१, एकूण क्षेत्र ००.३४.५० (हे. आर. चौ. मी.) आकार ४ रु. २७ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः

उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४३८ आणि ४४३
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ९९२
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४३७
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४४२

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १८/१२/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
## ग्राहकांसाठी विन्रम आवाहन

RDCC Bank
Let's grow together

बँकेची बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन ही शाखा सध्या श्री.विलास पांडुरंग तोडणकर, मु.पो.बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर कार्यरत आहे.

परंतु बोर्ली-पंचतन या शाखेकरीता बँकेने 'राजलक्ष्मी बिल्डींग'चे मालक श्री.संग्राम सदानंद खेऊर, माऊली हॉस्पिटलजवळ, मार्केट रोड, मु.पो.बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन यांच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर जागा भाड्याने घेतली आहे. त्यामुळे बोर्ली-पंचतन शाखेचे बँक कामकाज गुरुवार दिनांक १८-१२-२०२५ पासून नव्या जागेत स्थलांतरीत करण्यांत येत आहे. याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व बँकेस सहकार्य करावे ही विनंती.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक :-१६-१२-२०२५

सही/-
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळे, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) धमाय महादेव मोकल, २) सविता महादेव मोकल यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे तळे, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तळे ता.मुरुड | ४४/२१ | क्षेत्र ०-०९-१० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-०९-१० | १.०९ |

दिनांक : १८/१२/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला
मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम.कॉलेजजवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथे सर्व्हे नं./हिस्सा नं. ८/१, क्षेत्र १.७९.२० हे.आर.चौ.मी. आकार १३.८९ रू. पै. अशी मिळकत असुन त्यापैकी ०.०३.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र श्री. निलेश शरद भारती, श्री. वैभव हेमकिरण काळे, श्री. सिद्धेश विनोद मेहता यांनी निरंतर वहिवाटीच्या रस्त्याकरीता कायमस्वरूपी घेतलेले आहे. त्याबाबतची नोंद सदर मिळकतीच्या इतर अधिकारामध्ये केलेली आहे. परंतु, आमच्या अशिलांनी सदर मिळकतीमधील निरंतर वहिवाटीच्या रस्त्याकरीता दिलेले क्षेत्र श्री. निलेश शरद भारती व इतर २ यांचेकडून निरंतर वहिवाटीच्या रस्त्याकरीता कायमस्वरुपी घेणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर निरंतर वहिवाटीच्या रस्त्याकरीता दिलेले क्षेत्रासंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील इतर हक्कातील श्री. निलेश शरद भारती व इतर २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : १८/१२/२०२५

सही/
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता-शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो.नं.७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. निलेश शरद भारती श्री. वैभव हेमकिरण काळे श्री सिद्धेश विनोद मेहता | ७/४ | ०.४५.२० | ४.५० |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. निलेश शरद भारती व इतर २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे,

कर्जत
दिनांक : १८/१२/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्, मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे-धोंडसे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-धोंडसे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र.हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्रीमती. नयना संदिप कदम | २१/१ | २-०२-०० | ०-४४ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली - सुधागड
दिनांक-१७/१२/२०२५

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे शिंगढोल, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५५/१ | एकूण क्षेत्र ०-९३-३० हे.आर. | ५.३१ |
| ४६/२ | एकूण क्षेत्र २-०५-०० हे.आर. | १.२६ |
| ५१/१ | एकूण क्षेत्र ०-७६-०० हे.आर. | ०.४१ |
| ४६/५ | एकूण क्षेत्र ०-०८-०० हे.आर. | ०.१२ |
| ४६/३ | एकूण क्षेत्र १-६८-०० हे.आर. | ०.९७ |
| ४५ | एकूण क्षेत्र ०-११-६० हे.आर. | ०.६९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-१८/१२/२०२५

सही/-
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता :- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल शीला नरेंद्र शेलार, रा. मु. पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६ यांनी त्या मिळकतीचे मालक १. श्री. अर्जुन लक्ष्मण कडु, २. श्रीम. पिलाबाई उर्फ लक्ष्मीबाई जनार्दन पाटील, ३. श्रीम. मुक्ताबाई अमृता बडेकर, ४. मंजुळा जैतु कडू, ५. श्री. मिलिंद जैतू कडू, ६. श्री. लक्ष्मण वाळकु कडु. ७. श्री. अनंता जैतू कडू, ८. लता गणेश घरत, ९. भारती भरत चौधरी १०. ललिता पद्माकर ठाकरे, ११ मारूती परशुराम बडेकर १२. आरती तानाजी बिबवे यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे बेंडसे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १३ | १० | ०.१०.१० | ०.३५ |

तंदगभूतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा - कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी - हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी /हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १८-१२-२०२५

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी. एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की, आम्ही दि महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲण्ड ट्रस्टी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, इच्छापत्र तयार करणे, इच्छापत्राचे व्यवस्थापक (Executor) म्हणून अंमलबजावणी करणे, खाजगी व सार्वजनिक विश्वस्त निधी तसेच पॉवर ऑफ ॲटर्नी इ. चे व्यवस्थापक म्हणून सेवा देण्यासाठी १९४६ पासून कार्यरत आहोत. मेटकोचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून मुंबई नागपूर व ठाणे येथे शाखा आहेत. कै. पार्वतीबाई सदाशिव पवार (इच्छापत्र करणार) यांचा शेवटचा पत्ता घर नं. २५२, मौजे-आक्षी, ता अलिबाग, जि. रायगड ४०२२०४ इच्छापत्र/मृत्यूपत्र करणार यांनी त्यांच्या दि. ०२/०६/२००३ रोजीच्या अंतिम इच्छापत्राचे व्यवस्थापक (मेटको एक्झिक्युटर) म्हणून आमची म्हणजेच दि महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲण्ड ट्रस्टी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड युनिट ठाणेची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार त्यांच्या पश्चात त्यांच्या इच्छापत्रानुसार सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे व्यवस्थापन, प्रत्यक्ष ताबा घेणे, विक्री करणे, इच्छापत्रानुसार वाटप करणे, इ. हक्क व्यवस्थापक म्हणून आमच्या कंपनीच्या ठाणे शाखेकडे आहेत. कै. पार्वतीबाई सदाशिव पवार यांचे निधन दि. २७/०५/२०२३ रोजी आक्षी, अलिबाग येथे झाले. इच्छापत्र करणार यांनी त्यांच्या अंतिम इच्छापत्रानुसार त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीच्या मिळकती खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेले असून या मिळकती तसेच त्यांच्या नावे असलेल्या इतर कुठल्याही स्थावर मिळकती संदर्भातील सर्व हक्क इच्छापत्राचे व्यवस्थापक या नात्याने आमच्याकडे आहेत. त्या अनुषंगाने सदरच्या परिशिष्ठामधील मिळकती संदर्भात तसेच त्यांच्या नावे असलेल्या इतर कुठल्याही स्थावर मिळकती संदर्भात आमच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय कोणतेही कायदेशीर व्यवहार करू नयेत. तसेच सदर मिळकतीवर इतर कोणाचीही मालकी ताबा, वारसाहक्क, वहिवाट, लिज, पोटगी, जप्ती, कुळ, खंड, बक्षीसपत्र, करारमदार, विसारपावती, वगैरे कसल्याही प्रकारचा हितसंबंध व अधिकार अथवा बोजा असल्यास अशा सर्व संबंधीत व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आमची खालील नमुद केलेल्या कार्यालयीन पत्त्यावर लेखी कागदपत्रांसह समक्ष भेटून खात्री करून घ्यावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहित असल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल. तद्नंतर कोणाचीही, कसलीही, तकार ग्राह्य धरली जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मालमत्तांचे परिशिष्ठ**

| अ.क्र. | मालमत्तेचा प्रकार | पत्ता |
|---|---|---|
| १ | राहाते घर घर नं. २५२ | ग्रुपग्रामपंचायत आक्षी, आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड |
| २ | शेतजमीन भुमापन क्र. व उपविभाग १४ (स. नं. २, हि. नं. २) | मौजे-आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : /१२/२०२५

सही

संपर्क १ :- दि. महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲण्ड ट्रस्टी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड ठाणे युनिट द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र बी. ३७, महाबँक भवन, वागळे इस्टेट ठाणे (प.) ४००६०४

श्री. दाते प्रसाद युनिट इनचार्ज
फोन : ९८६९२३३८६५
ई मेल :-metcothane@mahabank.co.in

संपर्क २ :- दि. महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲण्ड ट्रस्टी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
METCO/TRUSTEE COMPANY (बँक ऑफ महाराष्ट्र च्या संपुर्ण मालकीची उपकंपनी)
भारतीय कंपनी अधिनियम २०१३ नुसार
नोंदणीकृत मुख्य कार्यालय, ५६८ केसरी वाडा, १ला मजला, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,
नारायण पेठ, पुणे ४११०३० ई मेल :- punemetco@mahabank.co.in
फोन :- ९४०४०५१९९७, ९४०४७८०७८७ सोम. ते शुक्र. (स.१० ते सायं.५)

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# ७७ खेळाडूंसाठी २१५.४५ कोटी खर्च

**||आयपीएल लिलावात ऑलराऊंडर्सचे वर्चस्व || ६ ऑस्ट्रेलियन खेळाडू ४५.७० कोटींना || ५ अनकॅप्ड भारतीयांवर ४५ कोटी**

**| अबू धाबी | प्रतिनिधी |**

अबू धाबी येथे २०२६ साठी मिनी लिलाव मंगळवारी झाला. ४८ भारतीय आणि २९ परदेशी खेळाडूंवर २१५.४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. ऑस्ट्रेलियाचे ६ खेळाडू ४५.७० कोटी रुपयांना विकले गेले. तर, भारताच्या अनकॅप्ड खेळाडूंनाही मोठी मागणी होती, टॉप-५ खेळाडूंवर ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले.



लिलावात २३ वेगवान गोलंदाज, ९ फिरकीपटू, १२ यष्टिरक्षक, १० फलंदाज आणि २३ अष्टपैलू खेळाडू विकले गेले. यामध्येही पॉवर हिटिंग कौशल्याला खूप जास्त मागणी होती. कोलकाताने सर्वाधिक १३, तर पंजाबने सर्वात कमी ४ खेळाडू विकत घेतले. मुंबईने सर्वात कमी २.२० कोटी रुपये खर्च केले. तर, स्टीव्ह स्मिथ, महीश तीक्षणा आणि डेव्हॉन कॉन्वे यांसारख्या दिग्गज खेळाडूंना खरेदीदारच मिळाला नाही.

मिनी लिलावात वेगवान गोलंदाजांना मागणी आणि अष्टपैलू खेळाडूंचे वर्चस्व दिसून आले. २३ अष्टपैलू खेळाडूंपैकी १२ जण करोडपती झाले, त्यापैकी ६ जणांची किंमत ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त होती. ३२ गोलंदाज विकले गेले, त्यापैकी १३ जण करोडपती झाले. ज्यामध्ये २ वेगवान गोलंदाज २७.२० कोटी रुपयांना विकले गेले. १० फलंदाज विकले गेले, त्यापैकी अव्वल खेळाडू कॅमेरॉन ग्रीनला वगळल्यास उर्वरित ९ जणांची किंमत केवळ ११.३५ कोटी रुपये होती. मात्र, यष्टिरक्षक फलंदाजांनी सर्वांनाच चकित केले. १२ यष्टिरक्षक ३८.६० कोटी रुपयांना विकले गेले, त्यापैकी १० जण करोडपती झाले. ९ फिरकी गोलंदाज विकले गेले, त्यापैकी केवळ ३ जणांची किंमत १ कोटी रुपयांपेक्षा जास्त होती.

आयपीएलच्या मिनी लिलावात स्थानिक अनकॅप्ड खेळाडू अनेकदा चर्चेत असतात. यावेळीही असेच काहीसे घडले. ४८ भारतीयांपैकी ३९ असे होते ज्यांनी अद्याप आंतरराष्ट्रीय पदार्पण केले नव्हते. तरीही, टॉप-५ खेळाडूंवर ४५ कोटी रुपये खर्च झाले. दोघांची किंमत १४ कोटी रुपयांपेक्षा जास्त होती, जो आयपीएल इतिहासातील विक्रम आहे. यापूर्वी हा विक्रम आवेश खानच्या नावावर होता, जो २०२२ मध्ये १० कोटी रुपयांना विकला गेला होता. लिलावात ऑस्ट्रेलियाच्या एका अनकॅप्ड खेळाडूलाही खरेदी करण्यात आले. वेगवान गोलंदाज अष्टपैलू जॅक एडवर्ड्स ३ कोटी रुपयांना हैदराबादचा भाग बनला. एकूण १० अनकॅप्ड खेळाडू करोडपती बनले, तर ३० खेळाडूंची किंमत ३० ते ९५ लाख रुपयांच्या दरम्यान होती.

लिलावात अष्टपैलू खेळाडूंवर सर्वाधिक खर्च होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांचे पॉवर हिटिंग कौशल्य. विकेटकीपर आणि फलंदाजांमध्येही तेच खेळाडू करोडपती झाले, ज्यांची पॉवर हिटिंग क्षमता खूप जास्त होती. कॅमरून ग्रीन, कार्तिक शर्मा, प्रशांत वीर आणि लियाम लिव्हिंगस्टन हे असे ४ फलंदाज होते, ज्यांना १० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत मिळाली. सर्वांचा टी-२० स्ट्राइक रेट १५० पेक्षा जास्त आहे. लिलावात जोश इंग्लिसच्या किमतीबाबतही एक धक्कादायक निर्णय पाहायला मिळाला. लखनऊ सुपरजायंट्सने त्याला ८.६० कोटी रुपयांना विकत घेतले, तेही तेव्हा जेव्हा तो संघासाठी संपूर्ण हंगाम खेळू शकणार नाही. इंग्लिसने स्वतःच पुष्टी केली आहे की तो फक्त काही सामने खेळू शकेल. तरीही, त्याला विकत घेतले कारण त्याचा स्ट्राइक रेट १६० पेक्षा जास्त आहे. आयपीएल लिलावात दरवेळी ऑस्ट्रेलियाचे खेळाडूच सर्वाधिक महागडे विकले जातात, यावेळीही असेच काहीसे घडले. ६ खेळाडूंना ४५.७० कोटी रुपयांची किंमत मिळाली. म्हणजेच, एका खेळाडूचे सरासरी उत्पन्न ७.५० कोटी रुपयांपेक्षाही जास्त राहिले. फलंदाज कॅमेरून ग्रीन तर स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात महागडा परदेशी खेळाडू ठरला.

## ठाण्यात रंगणार कबड्डीचा थरार

**| पाली/गोमाशी| प्रतिनिधी|**

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे या संस्थेचे विद्यमाने सुवर्ण महोत्सवी वर्ष संकल्पनेंतर्गत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे औचित्याने सुधागड तालुकास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धाचे आयोजन श्री मावळी मंडळ मैदान चरई, ठाणे येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष विठ्ठल बाबू घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

या संस्थेच्या वार्षिक क्रीडा महोत्सवानिमित्त सुधागड तालुक्यातील ३२ संघांना ठाणे या ठिकाणी कबड्डी खेळण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.रोजगारा निमित्त ठाणे येथे वास्तव्यास असणाऱ्या सुधागड वासीयांना ही स्पर्धा बघण्याची पर्वणी असणार आहे. या मंडळाच्या वतीने या स्पर्धेचे दिमाखदार असे नियोजन केले आहे.

या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक २११११ आणि आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक १५१११ आणि आकर्षक चषक, तृतीय क्रमांक ११११११ आणि आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक आणि आकर्षक चषक ही सांघिक बक्षिसे बक्षीसे देऊन गौरविण्यात येणार आहेत.

### संस्थेचे लोकोपयोगी उपक्रम

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे ही संस्था गेली ५० वर्ष शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्रात अग्रस्थानी आहे. तसेच तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील पितृछत्र हरपलेल्या, गरीब गरजू,होतकरू,व दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून शैक्षणिक विकास करण्यासाठी त्याना पाठबळ दिले जाते.

## ॲडलेड कसोटीत कॅरीचे शतक

**● पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलिया ३२६/८; आर्चरचे ३ बळी**

**| ओव्हल | प्रतिनिधी|**

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेसची तिसरी कसोटी ॲडलेड ओव्हलमध्ये खेळली जात आहे. बुधवारी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने ८ गडी गमावून ३२६ धावा केल्या आहेत. मिचेल स्टार्क आणि नॅथन लायन नाबाद परतले. यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरीने शतक (१०६ धावा) आणि उस्मान ख्वाजाने अर्धशतक (८२ धावा) झळकावले.



इंग्लंडने पहिल्या तासातच ऑस्ट्रेलियाला दोन मोठे धक्के दिले. जोफ्रा आर्चरने जेक वेदराल्डला बाद केले. त्यानंतर ब्रायडन कार्सने ट्रॅव्हिस हेडला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्यानंतर कसोटी संघात परतलेल्या उस्मान ख्वाजा आणि मार्नस लाबुशेनने डाव सांभाळला.लंचनंतर इंग्लंडने जोरदार पुनरागमन केले. आर्चरने आधी लाबुशेनला १९ धावांवर बाद केले. नंतर कॅमेरॉन ग्रीनला खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये पाठवले. येथून ॲलेक्स कॅरीने डाव सांभाळला. ख्वाजाने ८२ धावा केल्या.१८ धावांनी त्याचे शतक हुकले. तर कॅरी १०६ धावा करून बाद झाला. इंग्लंडकडून आर्चरने ३ बळी घेतले. कार्स आणि विल जॅक्सने प्रत्येकी २ बळी घेतले. जोश टंगला एक बळी मिळाला.

ॲडलेड कसोटीपूर्वी ऑस्ट्रेलियन संघाला मोठा धक्का बसला. संघाचा स्टार फलंदाज स्टीव्ह स्मिथ अचानक या कसोटी सामन्याच्या प्लेइंग-११ मधून बाहेर पडला. याची माहिती नाणेफेकीच्या वेळी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने दिली. ऑस्ट्रेलियाने या कसोटीसाठी आपल्या प्लेइंग-११ ची घोषणा सामन्याच्या एक दिवस आधीच केली होती, तर इंग्लंडने दोन दिवसांपूर्वीच आपला संघ जाहीर केला होता.

ऑस्ट्रेलियाच्या घोषित संघात स्मिथचे नाव समाविष्ट होते. नाणेफेकीच्या वेळी कमिन्सने सांगितले की, स्मिथ गेल्या काही दिवसांपासून ठीक वाटत नव्हता. त्याच्या जागी उस्मान ख्वाजाला संधी मिळाली.

## क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी मागवले प्रस्ताव

**| रायगड | प्रतिनिधी|**

सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या वर्षाचे पुरस्कार वितरणासाठी या कार्यालयामार्फत अर्ज मागविण्यात येत असून इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

या पुरस्कारामध्ये प्रत्येक विजेत्याला १० हजार रोख, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह असे बक्षिस दिले जाणार आहे. सन २०२३-२०२४ या वर्षाचे पुरस्काराकरिता ०१ जुलै २०१९ ते ३० जून २०२४ पर्यंतचे काम गिरी तर सन २०२४-२०२५ या वर्षाचे पुरस्काराकरिता ०१ जुलै २०२० ते ३० जून २०२५ पर्यंतची कामगिरी ग्राह्य धरले जातील.

या पुरस्कारांतर्गत पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून एक महिला खेळाडू, एक पुरुष खेळाडू व एक दिव्यांग खेळाडू यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यामध्ये खेळाडूंनी लगतपूर्व पाच वर्षांपैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेम ध्ये प्रतिनिधित्व केलेले असले पाहिजे. खेळाडूने मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा मधील पुरस्कार वर्षाच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वरिष्ठ गटामध्ये, शालेय मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल. यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या तीन वर्षाच्या कामगिरीचा विचार करण्यात येईल. खेळाडूने त्यांचे अर्ज विहित नमुन्यात व विहित मुदतीत ३० डिसेंबर २०२५ पर्यंत या कार्यालयात सादर करावेत. खेळाडूच्या वतीने सादर करण्यात येणाऱ्या अर्जासोबत स्पर्धेचे मूळ प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वाक्षंकितमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग पंधरा वर्ष वास्तव्य असले पाहिजे. संबंधित जिल्ह्यात क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष क्रीडा मार्गदर्शन म्हणून कार्य केलेले पाहिजे व त्यांचे वय ३० वर्ष पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. गुणांकन करिता त्या जिल्ह्यातील खेळाडूंची कामगिरी ग्राह्य धरली जाईल. एका जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यात पात्र राहणार नाही. एकदा एका खेळामध्ये किंवा एका प्रवर्गामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त केलेल्या व्यक्तीस पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

## आयपीएलमुळे पाकिस्तानमध्ये खळबळ

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने सर्व फ्रँचायझींना कळवले आहे की, २०२६ ची सुरुवात २६ मार्चपासून होणार असून अंतिम सामना ३१ मे रोजी खेळवण्यात येणार आहे. आयपीएलच्या वेळापत्रकाच्या तारखा समोर आल्यानंतर पाकिस्तानमध्ये मात्र खळबळ उडाली आहे. याचं कारण म्हणजे पाकिस्तान सुपर लीग चा ११वा हंगामही २६ मार्चपासून सुरू होणार आहे, तर त्यांचा अंतिम सामना ३ मे रोजी होणार आहे. यामुळे आयपीएल आणि पीएसएल या दोन्ही टी २० लीग एकाच कालावधीत होणार आहेत. भारतात आयपीएलची लोकप्रियता शिखरावर असताना पीएसएल खेळवली जाणार असल्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आर्थिक फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## वरूण चक्रवर्तीचा आयसीसी क्रमवारीत जलवा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिका सुरू असतानाच आयसीसी टी-२० क्रमावारी जाहीर झाली आहे. यादरम्यान फिरकीपटू वरूण चक्रवर्तीने इतिहास घडवला आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेत वरुणची फिरकी संघासाठी फायदेशीर ठरत आहे. वरुणने आधीच तीन सामन्यांमध्ये सहा विकेट्स घेतल्या आहेत. तिसऱ्या टी-२० मध्ये, वरुणने कमालीची गोलंदाजी केली आणि फक्त ११ धावांमध्ये दोन महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. यासह त्याने टी-२० क्रमवारीत आपल्या नावाचा दबदबा तयार केला आहे.वरुणने आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत असा टप्पा गाठला आहे जो आतापर्यंत कोणत्याही भारतीय गोलंदाजाने गाठला नव्हता. तो क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये सर्वाधिक टी-२० रेटिंग मिळवणारा गोलंदाज बनला आहे. भारताच्या या फिरकीपटूने क्रमवारीतील आपले अव्वल स्थान आणखी मजबूत केले आहे. वरुण या फॉरमॅटमध्ये भारतासाठी सर्वाधिक रेटिंग मिळवणारा गोलंदाजही बनला आहे. वरुणचे आता एकूण ८१८ रेटिंग गुण आहेत. वरूण चक्रवर्तीने ८१८ रेटिंग गुणांसह जसप्रीत बुमराहाला मागे टाकलं आहे. २०१७ मध्ये जसप्रीत बुमराहने ७८३ गुण मिळवले होते आणि आता वरुणने ८०० गुणांचा टप्पा ओलांडला आहे. वरुण चक्रवर्तीने टी २० स्वरूपात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतही तो वर्चस्व गाजवत आहे.

**मलेशियाविरुद्ध २०९ धावा केल्या | १६ चौकार, ९ षटकार समाविष्ट**

## अभिज्ञान कुंडूचे नाबाद द्विशतक

**| दुबई | प्रतिनिधी |**

दुबई भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज अभिज्ञान कुंडूने मलेशियाविरुद्ध खेळल्या जात असलेल्या अंडर-१९ आशिया कप सामन्यात नाबाद द्विशतक झळकावले आहे. भारत आणि मलेशिया यांच्यातील हा सामना दुबईतील द सेव्हन्स स्टेडियमवर खेळला जात आहे. मलेशियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.भारतासाठी पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या यष्टिरक्षक फलंदाज अभिज्ञान कुंडूने तीन विकेट पडल्यानंतर वेदांत त्रिवेदीसोबत २०९ धावांची भागीदारी केली. कुंडूने १२५ चेंडूंमध्ये २०९ धावांची नाबाद खेळी केली. यात १६ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता.

अभिज्ञान कुंडू याने सुरूवातीला ८० चेंडूत शतक झळकावलं. तर फक्त १२१ चेंडूंत त्याने वादळी फटकेबाजी करत द्विशतक पूर्ण केलं. अभिज्ञान १२५ चेंडूंत १७ चौकार व ९ षटकारांसह २०९ धावांची खेळी करत नाबाद परतला. अभिज्ञान कुंडूच्या द्विशतकाबद्दल सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे त्याने पाचव्या क्रमांकावर खेळताना द्विशतक झळकावलं. वैभव सूर्यवंशी बाद झाल्यानंतर कुंडू क्रीजवर आला आणि त्याने आक्रमक फटके खेळण्यास सुरुवात केली. डावखुऱ्या फलंदाजाने फक्त ४४ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतरच्या पुढच्या ३६ चेंडूत आपले शतक पूर्ण केलं, म्हणजेच त्याने एकूण ८० चेंडूंत शतक पूर्ण केलं. कुंडूने यानंतर धावांचा वेग वाढवला आणि फक्त १२१ चेंडूत षटकार आणि चौकारांसह आपलं द्विशतक पूर्ण केलं. त्याने षटकारासह आपलं द्विशतक पूर्ण केलं. त्याने नऊ षटकार आणि १६ चौकारांसह द्विशतकी खेळी केली. अभिज्ञान कुंडूने १९ वर्षांखालील आशिया चषकात द्विशतक झळकावून इतिहास घडवला. १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यात द्विशतक झळकावणारा तो पहिला भारतीय ठरला. त्याने १२५ चेंडूत २०९ धावा करत नाबाद राहिला. सौम्य सरकार हा १९ वर्षांखालील स्तरावर द्विशतक करणारा एकमेव आशियाई खेळाडू होता; त्याने २०१२ मध्ये २०९ धावाही केल्या होत्या, परंतु कुंडूने २०९ धावांवर नाबाद राहून हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. अभिज्ञान कुंडूचा जन्म २००८ मध्ये झाला. या खेळाडूने मुंबईत लहानपणापासून क्रिकेटचे धडे गिरवले.



## निवडक



### पॉवरलिफ्टर गणेश तोटेचे स्वागत

**पनवेल :** तुर्की येथे आशियाई पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड स्पर्धा नुकतीच पार पडली.या स्पर्धेत रायगडचा खेळाडू गणेश पुष्पा संजय तोटे हा खेळाडू १०५किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदकाचा मानकरी झाला. पनवेल भिंगरी येथील रहिवासी असलेला आणि पुणे सासवड येथील वाघेरे महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेला,वडिलांचे निधन झाल्यानंतर तीन दिवसांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेला रवाना होऊन पदक प्राप्त करून वडिलांना श्रद्धांजलीच दिली. एकूण ८१७.५ एवढे वजन स्कॉट, बेंचप्रेस, डेडलिफ्ट या प्रकारात गणेशाने उचलले. त्यामुळे त्याला स्कॉट मध्ये रौप्य पदक, बेंचप्रेस कांस्य सर्व स्पर्धकात कांस्य अशी एकूण तीन पदक प्राप्त झाले. त्याने त्याच्या यशाचे श्रेय प्रशिक्षक विशाल मुळे आणि जिम संचालक प्रमोद पवार यांना दिले आहे. त्याचबरोबर पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या समस्त कार्यकारिणीने सुद्धा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या होत्या.तसेच स्पर्धेच्या दिवशी आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, राज्य संघटनेचे सचिव संजय प्रतापराव सरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले याबाबत त्याने कृतज्ञता व्यक्त केली.

### यशस्वी जैस्वालची तब्येत बिघडली

**पुणे :** भारतीय क्रिकेट चाहत्याचं सर्व लक्ष काल इंडियन प्रीमिअर लीग २०२६ च्या लिलावाकडे होते, त्याचवेळी दुसरीकडे मुंबई क्रिकेट संघाच्या ताफ्यात गोंधळाचं वातावरण पसरलं.



सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील सुपर लीगमधील राजस्थानविरुद्धच्या सामन्यानंतर यशस्वी जैस्वालची प्रकृती अचानक बिघडली आणि त्याला पुण्यातील आदित्य बिर्ला हॉस्पिटलमध्ये तातडीने दाखल करण्यात आले. सामना संपल्यानंतर लगेचच जैस्वालने पोटात तीव्र वेदना होत असल्याची तक्रार केली आणि त्याला वैद्यकीय तपासणीसाठी येथील आदित्य बिर्ला रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तीव्र गॅस्ट्रोएन्टेरिटिस असल्याचे निदान केले. २३ वर्षीय खेळाडूला औषध देण्यात आले. खबरदारी म्हणून त्याचे अल्ट्रासाऊंड आणि सीटी स्कॅन देखील करण्यात आले आणि त्यानंतर त्याला औषधांसोबत विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अस्वस्थ वाटत असतानाही जैस्वाल संध्याकाळी मैदानात उतरला आणि मुंबईसाठी फलंदाजी केली. त्याने १६ चेंडूत १५ धावा केल्या आणि मुंबईने २१७ धावांचे आव्हान पार केले. अजिंक्य रहाणेच्या नाबाद ७२ आणि सर्फराज खानच्या २२ चेंडूत ७३ धावांच्या खेळीमुळे मुंबईने तीन विकेट्सने विजय मिळवला. गतविजेत्या संघाचा नेट रन रेट कमी असल्याने त्यांना अंतिम फेरीत प्रवेश करता आलेला नाही.मिळालेल्या माहितीनुसार, जैस्वालला सामन्यादरम्यान पोटात दुखण्याचा त्रास होत होता. सामन्यानंतर वेदना तीव्र होत गेल्या आणि त्याला तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी लागली.

### श्वेता कोवेने जिंकलं ‘सुवर्ण’

**दुबई :** गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाची खेळाडू श्वेता कोवे हिने दुबई येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन युथ पॅरा गेम्समध्ये पॅरा आर्चरी या क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. श्वेता कोवे ही गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न आष्टी येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विविध देशांतील नामवंत खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत श्वेता कोवे हिने उत्कृष्ट कौशल्य, मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले. यासोबतच तिने मिश्र प्रकारात कांस्यपदक पटकावत दुहेरी यश संपादन केले. ग्रामीण व आदिवासीबहुल आष्टी येथील खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब असून, यामुळे महात्मा फुले महाविद्यालय आणि गोंडवाना विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले आहे. श्वेताला डॉ. श्याम कोरडे यांनी प्रशिक्षण दिले. या कामगिरीबद्दल गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, क्रीडा संचालक डॉ. अनिता लोखंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय फुलझेले आदींनी तिचे अभिनंदन केले आहे.



### प्रभादेवीत कबड्डी स्पर्धेचे धुमशान

**मुंबई :** आगरी सेवा संघ, मुंबई यांच्या विद्यमाने मुंबई शहर कबड्डी असो. च्या मान्यतेने दि. १८ ते २१ डिसें. या कालावधीत पुरुष द्वितीय श्रेणी गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री साई विरुद्ध अमर सुभाष या सामन्याने या रंगतदार धुमशानला सुरुवात होईल. प्रभादेवी येथील राजाराम साळवी उद्यानातील स्व. दि. बा. पाटील क्रीडानगरीत होणाऱ्या या स्पर्धेत १६ संघानी आपला सहभाग नोंदविला आहे. सायंकाळी ०६-०० ते १०-०० या वेळेत प्रखर विद्युत झोतात हे सामने खेळविण्यात येतील. स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघाला आगरी चषक व रोख रुपया बरोबर त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे बोकड बक्षीसा दाखल देण्यात येईल. उपविजयी संघाला देखील चषक व रोख रुपया बरोबर कोंबडी बहाल करण्यात येईल. दोन्ही उपांत्य संघाना चषक व रोख रु. देऊन सन्मानीत करण्यात येईल. त्याचं बरोबर स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट पकड, चढाई यांचा देखील येतोचित सन्मान करण्यात येईल. या स्पर्धेचे उदघाटन गुरु. दि. १८ डिसें. रोजी सायं. ०६-०० वा. करण्यात येईल. अशी माहिती एका पत्रकाद्वारे सचिव सुभाष ठाकूर यांनी सर्व प्रसार माध्यमाना दिली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)